# आधुनिक केसरी

मंगळवार, 18 ऑक्टोबर 2022

⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - 02 ⊙ अंक -72

Title Code : MAHMAR51117

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● TUESDAY 18 OCTOBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-72 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-12 ● PRICE-5


महत्वाची बातमी

## सुप्रीम कोर्टाची सीबीआयला नोटीस

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारतीय जनता पार्टीचे वरिष्ठ नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली होती. देशात घडलेल्या विविध बँकिंग घोटाळ्यात भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (आरबीआय) बड्या अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करण्यात आली नाही, संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करावी, अशी विनंती सुब्रमण्यम स्वामी यांनी याचिकेद्वारे सर्वोच्च न्यायालयाकडे केली होती. या याचिकेवर सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. यानंतर न्यायालयाने केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात सीबीआय आणि आरबीआयला नोटीस जारी करू, असे म्हटले आहे. या प्रकरणात सुब्रमण्यम स्वामी यांच्यासह वकील सत्य सभरवाल हेही सह-याचिकाकर्ते आहेत. किंगफिशर, बँक ऑफ महाराष्ट्र आणि येस बँक यासारख्या विविध बँकिंग घोटाळ्यात रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांची भूमिका तपासली नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी व्हावी, अशी मागणी सुब्रमण्यम स्वामी यांनी याचिकेद्वारे केली होती. न्यायमूर्ती बी आर गवई आणि न्यायमूर्ती बी वी नागरत्ना यांच्या खंडपीठापुढे ही सुनावणी पार पडली.

# राजकारणात सगळ्याच गोष्टी सांगायच्या नसतात

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले निवडणुकीतील माघारीचे कारण

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : अंधेरी पोटनिवडणुकीतून उमेदवारी मागे घ्या, अशी काहींनी समोरून केली तर काहींनी मागून मागणी केली. आता मागून कोणी केली हे विचारू नका, राजकारणात सगळ्या गोष्टी सांगायच्या नसतात. पण ज्यांनी कोणी केली, त्यावर विचार करून मी स्वत: मुख्यमंत्र्यांशी बोललो, आमच्या वरिष्ठांशी बोललो. आमच्या टीमशी चर्चा केली आणि या चर्चेनंतर हा निर्णय आम्ही घेतला, असे स्पष्टीकरण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**



राज्याच्या राजकारणात सध्या सर्वाधिक चर्चा सुरू असलेल्या अंधेरी पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कालपासून जोरदार राजकीय घडामोडी सुरू होत्या. मनसे अध्यक्ष राज ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी ही निवडणूक बिनविरोध व्हावी, असे म्हटले होते. त्यानंतर आज सकाळपासूनच भाजपाच्या गोटात वेगवाग हालचाली सुरु असल्याचे दिसून येत होते. त्यावरून भाजपा आपला उमेदवार मागे घेणार असल्याचे निश्चित मानले जात होते. अखेर भाजपाने या निवडणुकीतून माघार घेत असल्याचे जाहीर केले. भाजपाच्या या निर्णयानंतर राजकीय वर्तुळातून तसेच सर्वसामान्यांमधून विविध प्रतिक्रिया उमटत आहेत आणि वेगवेगळे अंदाजही लावले जात आहेत. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देत भाजपाने निवडणुकीतून माघार घेण्याचे कारण सांगितले आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अंधेरीच्या पोटनिवडणुकीच्या संदर्भात आमच्याकडे बराच विचार झाला, विशेषता कार्यकर्त्यांचे मत होते आम्ही निवडणूक लढवली पाहिजे, मुंबई युनिटचेही मत होते आम्ही निवडणूक लढवली पाहिजे. मुरजी पटेलांसारखा उमेदवार ज्यांनी अपक्ष असूनही ४५ हजारांपेक्षा अधिक मते घेतले तो उमेदवार आम्ही उभा केला होता. त्यामुळे आम्हाला निवडून येण्याची पूर्ण खात्री होती. तथापि काहींनी आम्हाला विनंती केली, काही ज्येष्ठांनी विनंती केली. तुम्हालाही कल्पना आहे की राज ठाकरे किंवा शरद पवार असतील. हा निर्णय काही आम्ही पहिल्यांदा घेतलेला नाही. आर.आर.पाटील ज्यावेळी गेले होते तेव्हाही आम्ही असा निर्णय घेतला होता. पतंगराव कदम गेले होते तेव्हाही आम्ही असाच निर्णय घेतला होता. त्यामुळे हा काही पहिल्यांदा घेतला निर्णय नाही. काही लोक छोट्या-छोट्या मनाचे असतात. त्यामुळे तुम्ही कसाही निर्णय घेतला तरी ते त्या संदर्भात बोलत असतात. पण आता ते जे काही बोलले आहेत, त्याला उत्तर ग्रामपंचायतीच्या निकालानेच दिले आहे. हे खरे आहे भाजपाचे कार्यकर्ते नाराज झाले. कारण ते पूर्ण लढण्याच्या मूडमध्ये होते. पण शेवटी नेते म्हणून आपल्याला काही प्रथा, परंपरा पाळाव्या लागतात. परिस्थितीत संवेदनशील निर्णय घ्यावे लागतात आणि म्हणून कधीकधी कार्यकर्त्यांनी नाराजी पत्कारूनही असे निर्णय करावे लागतात, तेव्हा मी केला आहे, असेही फडणवीस यावेळी म्हणाले.

अंधेरी पोटनिवडणूक बिनविरोध करावी यासाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काल देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवले होते. याशिवाय, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनीही पत्रकारपरिषदेत ही निवडणूक बिनविरोध झाली पाहिजे असे मत व्यक्त केले होते. यानंतर भाजपाच्या गोटात हालचालींना वेग आला होता. सकाळपासून भाजपाच्या बैठका सुरू होत्या आणि अखेर दुपारी भाजपाने निवडणुकीत माघार घेत असल्याचे जाहीर केले याच पार्श्वभूमीवर शिवसेनेचे नेते संजय राऊत यांनी आज भाजपाला राज ठाकरेंनी लिहलेले पत्र हा 'स्क्रिप्ट'चा भाग होता, असे म्हणत भाजपावर टीका केली आहे. यावर भाजपाकडून प्रत्युत्तरही देण्यात आले आहे.

## दिवाळीची लगबग



सध्या सर्वत्र दिवाळीची लगबग सुरु झाली आहे. दिवाळीत लक्ष्मीपूजनासाठी लक्ष्मीच्या मूर्ती कारागिरांकडून बनवण्यात येत आहेत. लक्ष्मीच्या मूर्तीवर शेवटचा हात फिरविताना महिला कारागीर.

## पुण्यात सणासुदीच्या काळात 10 दिवस वाहतुकीचा दंड नाही : चंद्रकांत पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** दिवाळीच्या काळात पुण्यातील अनेत रस्त्यांवर वाहतूक कोंडी होते. त्यामुळे पुणेकरांना मनस्ताप सहन करावा लागतो. पुढील 10 दिवस पुणेकरांकडून कोणताही दंड आकारण्यात येणार नसल्याची घोषणा पालकमंत्री चंद्रकांत पाटलांनी केली आहे. त्यामुळे पुढील 10 दिवस पुणेकरांची दंडापासून सुटका होणार आहे. मागील काही दिवस झाले पुण्यात दिवाळीच्या खरेदीच्या निमित्ताने प्रचंड प्रमाणात गर्दी होत आहे. मध्यवर्ती परिसरात वाहनांच्या रांगाच रांगा बघायला मिळत होत्या. त्यामुळे अनेक पुणेकर वाहतुकीचे नियम तोडून मार्ग काढत होते. पोलिसांनाही या गर्दीवर नियंत्रण ठेवणे आणि कारवाई करणे शक्य होत नव्हते. त्यामुळे 10 दिवस कोणताही दंड आकारण्यात येणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केलं आहे. 1 हजार 58 कोटी रुपयांच्या मागील सरकारच्या कामांना या सरकारने परवानगी दिली होती. स्थगिती उठवताना सरसकट न उठवता त्याची पडताळून पहायचे ठरवले. त्यानुसार प्रत्येक मतदारसंघातील लोकप्रतिनिधींना त्यांच्या मतदारसंघातील कोणत्या कामांना प्राधान्य द्यायचे हे ठरवण्यास सांगण्यात आले आहे. त्यानंतर पुढचे काही दिवस प्रत्येक खात्याच्या अधिकाऱ्यांसोबत बैठका घेऊन नवीन विकास आराखडा तयार करण्यात येईल. 1 नोव्हेंबरपासून नवीन विकास आराखडा राबवण्यास सुरुवात होईल. जिल्हा नियोजन समित्या नव्याने तयार करण्यात येणार आहेत, या संदर्भात बैठकीत चर्चा झाली.

पुण्यातील वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी पुणे मनपा आयुक्त आणि पोलीस आयुक्त मिळून ॲक्शन प्लान तयार करतील. रस्त्यावर चलान फाडण्यात वेळ घालवू नये त्यासाठी शहरात नवीन नाले बांधण्याची गरज आहे. मोठे नाले बांधण्यासाठी काम करा, अशा सूचना या बैठकीत चंद्रकांत पाटलांनी केल्या.

**'आधी रस्ते नीट करा' :** पुण्यात दरवर्षीच्या तुलनेत यावर्षी प्रचंड प्रमाणात पाऊस झाला. त्यामुळे पुणेकरांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. अनेक रस्त्यांची दुर्दशा झाली. त्यामुळे पुणे शहरात प्रत्येक परिसरात वाहतूक कोंडी होते. खड्ड्यांमुळे वाहनाची गती कमी होत असल्याने अपघात होतात. त्यामुळे वेगळी वाहतूक कोंडी होते. त्यामुळे सुरुवातील शहरातील रस्ते नीट करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी शहरातील 400 किलोमीटरचे रस्ते दुरुस्त करण्यासाठीच्या आराखड्याला मंजुरी दिल्याची माहिती चंद्रकांत पाटील यांनी दिली आहे. सरकार आल्यानंतरच्या जिल्हा नियोजन समितीच्या पहिल्याच बैठकीत त्यांनी हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे रस्ते येत्या काळात चांगले होऊन वाहतूक कोंडी कमी होण्याची शक्यता आहे.

# नागपुरात सुनील केदारांनी करुन दाखवले

## पंचायत समितीनंतर जिल्हा परिषदेचे मैदान काँग्रेसने मारले

आधुनिक केसरी न्यूज

नागपूर : राज्यातील महाविकास आघाडी सरकार कोसळल्यानंतर नागपूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीवर प्रभाव पडेल, असे बोलले जात होते. राज्यातील सत्तांतरानंतर भाजपनेही काँग्रेसमधील नाराजांना गळाला लावण्याचा प्रयत्न केला. तसेच काँग्रेसचे एक बंडखोर नेते काही काळासाठी 'नॉट रिचेबल'ही होते. त्यांनी काही माध्यमांसमोर आपली नाराजी उघडपणे बोलूनही दाखविली होती. मात्र या तीन दिवसांच्या नाट्यमय घडामोडींवर अखेर सोमवारी ब्रेक' लागला. पुढील अडीच वर्षासाठी अध्यक्ष व उपाध्यक्षपदासाठी आज झालेल्या निवडणूकीत नागपूर जिल्हा परिषदेवर काँग्रेसचे माजी मंत्री आमदार सुनील केदार गटाचे निर्विवाद वर्चस्व सिद्ध झाले. सुनील केदार यांच्या अभेद्य व्यूहरचनेमुळे अध्यक्षपदी पाटनसावंगी सर्कलच्या मुक्ता कोक्कड्डे तर उपाध्यक्षपदी गोधनी सर्कलच्या कुंदा राऊत यांची निवड करण्यात आली. राज्यातील सत्तांतरानंतर जिल्हा परिषदेतही सत्तांतर होईल अशा अंदाज जिल्हा परिषद वर्तुळात वर्तविण्यात येत होता. मात्र काँग्रेस नेते माजी मंत्री आमदार सुनील केदार यांनी जिल्हा परिषदेच्या राजकारणावर आपली पकड अजूनही मजबूत असल्याचे या निकालातून सिद्ध केले. जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीदरम्यान मागील तीन दिवस नाट्यमय घडामोडी घडल्या. त्यामुळे दरम्यान पक्षांतर्गत धाकधूक वाढली होती.




### अंतर्गत कलहामुळे वाढली होती धाकधूक

मागील काही दिवसांपासून काँग्रेस पक्षाला अंतर्गत कलहाचा सामना करावा लागला असता विरोधी पक्षाने सुध्दा आपली व्यूहरचना रचली. निवडणूक रिंगणात तरबेज असणारे सुनील केदार यांना मात्र मात देता आली नाही. काँग्रेस पक्षाच्या मुक्ता कोक्कड्डे यांनी अध्यक्ष पदाच्या निवडणुकित 39 विरुद्ध 18 मतांनी विजय संपादन केला. त्याचप्रमाणे उपाध्यक्ष पदाच्या निवडणुकीत काँग्रेसच्या कुंदा राऊत यांनी 38 विरुद्ध 19 मतांनी विजय संपादित केला.

### ही परिवर्तनाची नांदी : केदार

हा निवडणुकीचा निकाल म्हणजे परिवर्तनाची नांदी आहे. भविष्यात सुद्धा अश्याच निकालाची अपेक्षा आहे. हा विजय म्हणजे महाविकास आघाडी सरकारने केलेल्या कामाची पावती होय. यानंतर सुद्धा ग्रामीण भागातील नागरिकांच्या विकासाकरिता तत्पर राहणार असल्याचे मंत्री सुनील केदार यांनी यावेळी सांगितले.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# अनंत अमुची ध्येयासक्ती...

आधुनिक केसरी

त्यावेळी तिबेटमध्ये अंधांची शाळा सुरु करणे सोपे नव्हतं. कारण तिबेटी लोक अंधत्व हा एक शाप असून ते मागील जन्मी केलेल्या पापकर्माचं फळ आहे असं मानत होते. त्यामुळे अंध मुलांना शाळेत पाठवण्याचेच काय परंतु जीवन जगण्याचे सारे रस्तेच जणू त्यांनी बंद केले होते. आपल्या मुलांना ते घरात दडवून ठेवत. प्रसंगी पलंगाला बांधून ठेवत. या सगळ्या गोष्टी कशा चुकीच्या आहेत, अंध माणसे पण आयुष्यात काही करून दाखवू शकतात हे सेब्रीने या लोकांना पटवून दिले. हे काम सोपे नव्हते. शिवाय तेथील अधिकारी तिच्याकडे संशयाच्या नजरेने पाहत होते. पण म्हणतात ना की ज्याच्या डोळ्यासमोर ध्येय असते काही करून दाखवण्याचे त्याला माणसेच काय पण निसर्ग, दैव सुद्धा साथ देते. तिच्या या अथक प्रयत्नांना यश आले. आणि आजपर्यंत तिबेटमध्ये अंधांना शिक्षण देणारी पाच केंद्रे सुरु झाली. या दरम्यान पॉलसोबत तिने तिबेटन अंधांसाठी ब्रेल लिपी विकसित केली. आणि अंधांच्या शैक्षणिक जगतात एक मोठी क्रांती घडवून आणली.

पण इथे थांबेल ती सेब्री कसली ? आपल्या कार्याच्या दृष्टीने तिला आणि पॉलला तिबेटमध्ये अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. आपल्या कार्याचा विस्तार करण्यासाठी त्यांना दुसरी जागा शोधणे भाग होते. आणि अशी जागा त्यांना भारतात आढळली. ती केरळची राजधानी असलेल्या त्रिवेंद्रम किंवा थिरुअनंतपूरममध्ये. हे ठिकाण मध्यवर्ती आणि सर्व दृष्टींनी सोयीचे त्यांना वाटले. या ठिकाणी त्यांनी ' कंथारी इंटरनॅशनल ' ही संस्था सुरु केली. कंथारी हे नाव कसं सुचलं यामागेही एक मजेशीर कथा आहे. केरळमधील लोकांच्या अंगणात कंथारी या नावाचं एक छोटं रोपटं लावलेलं असतं . त्याला छोट्या मिरच्या लागतात. ही मिरची अतिशय तिखट असते. ही मिरची केवळ मसाल्याचा पदार्थ नसून एक औषधी वनस्पती देखील आहे. की जी अनेक आजारात उपयोगी पडते. आपली संस्था ही अशीच समाजाच्या उपयोगी पडावी या हेतूने या संस्थेचे नाव ' कंथारी ' असे ठेवले. या ठिकाणी सगळ्या जगातून विद्यार्थी येऊ लागले. पण इथली प्रवेश पद्धती कडक होती. अंध, अपंग अशा विद्यार्थ्यांसाठीच ही संस्था होती पण सेब्री आणि पॉल अशाच विद्यार्थ्यांना प्रवेश देत होते की ज्यांची समाजासाठी काही करण्याची इच्छा होती. या ठिकाणाहून शिकून गेलेल्या विद्यार्थ्यांनी आपापल्या देशात जाऊन स्वतःचे प्रकल्प सुरु केले. या लोकांना सेब्रीने आपल्या पायावर उभे केले एवढेच नव्हे तर स्वतः अंध अपंग असलेल्या व्यक्ती इतरांच्या आधार बनल्या. हे सेब्रीच्या कार्याचे मोठेच यश म्हणावे लागेल.

एव्हरेस्टवरती गेलेल्या पहिल्या अंध व्यक्तीच्या मदतीने सेब्री आपल्या शाळेतील सहा मुले एव्हरेस्ट मोहिमेवर घेऊन गेली. हे आव्हान कसं वाटलं ? हिमालय तुमच्या नजरेतून कसा वाटला ? यावर ती म्हणते, ' जेव्हा एखादे आव्हान माझ्यासमोर असते, तेव्हा मी मनाने कमकुवत असण्याचा प्रश्नच येत नाही. **(क्रमशः)**




## आनंदी पहाट

# आनंदातिरेक समाजासाठी घातक ठरू नये

आधुनिक केसरी

लहान वयात मानसिक परिपक्वता कमी असते. अनेक बाबतीत समज, उमज देखील कमीच असते; अर्थात ही उणिव निश्चितच नाही, परंतू त्याकारणाने चांगले-वाईट, खरे-खोटे, आपले-परके, फायदा-तोटा अशा अनेक बाबींचे आकलन त्वरित होत नाही. अनेकदा वाईटच चांगले वाटत असते. म्हणजेच जे नकोय तेच हवे असते. लहान मुलांमध्ये असे चित्र दिसून येणे स्वाभाविकच असते. पण काही प्रमाणांत हे मोठ्यांच्या बाबतीत देखील जेव्हा दिसते तेव्हा मात्र बाल हट्ट केल्यासारखे वागणे ही त्यांच्यातील उणिव असते एवढे निश्चित. मोठ्यांच्या बाल हट्टाचा परिणाम देखील अनेक बाबतीत होतो, अनेकांना त्याचा मानसिक त्रासही होतो. ह्याची जाणीव वेळीच होणे जरुरीचे असते. ह्या हट्टामध्ये समाविष्ट केली जाणारी अथवा अनावधानामुळे संबंधित आर्थिक बाब ही अनेकांची डोकेदुखी ठरते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अलीकडच्या काळांत साजरे केले जाणारे आप्तेष्टांचे, मित्रमंडळींचे वाढदिवस आणि त्यासाठी मुलांकडून होणारा हट्ट हा त्याचाच एक भाग म्हणता येईल. वाढदिवस पूर्वी देखील साजरे होत असत, परंतू त्याचे स्वरूप अतिशय निराळे होते. अनेकदा ते आपापल्यापरीने घरांतच साजरे होत असत. अलीकडच्या काळांतील वाढदिवस आदल्या दिवशी रात्री बारा वाजल्यापासूनच साजरे व्हायला लागतात. त्या उत्साहात आणि आनंदातिरेकाने इतरांना होणाऱ्या त्रासाचा का बरे विचार होऊ शकत नाही? ह्याची जाणीव घरच्यांकडून अशांना का करून दिली जात नाही? घरच्यांनाच त्याची जाणीव नसणे हीच उणिव म्हणावी लागेल. अशांतता पसरवणाऱ्या ह्या स्पीकर्सच्या भिंतीचा स्वीकार आणि अंगीकार करणाऱ्यांच्या उणिवा त्यांना दाखवून देणे म्हणजे मांजरीच्या गळ्यांत घंटा बांधण्यासारखेच असते. ह्याचे एकूणच होणारे दुष्परिणाम समजून घ्यायच्या मनस्थितीत अशावेळेस असणारे किती जण असल्याचे दिसते.



आधुनिक केसरी

### जाण साधुसंता | क्षणभर ||

अंगीचे सामर्थ्य | जिंकतो हा खेळ ||
उसणे ते बळ | काय कामी ||१||

अनुभव सांगे | हीताचेच बोल ||
होय त्याचे मोल | जगतात ||२||

अंतरी जागवा | कारूण्य ओलावा ||
लीनतेचा धावा | विठु ऐके ||३||

पाठांतर मुखी | अभ्यासाची कास ||
वाढवी विश्वास | किर्तीमान ||४||

विनय दागिना | शोभे प्रज्ञावंता ||
जाण साधुसंता | क्षणभर ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरूपण"

आधुनिक केसरी

### श्रीगुरुवंशवंदना

योगानंद स्वामी, शाक्तपंथी थोर।
तेचि मिटवीती, संसाराचे घोर।।
भगवानशास्त्री, तयांचे अवतार।
सकल जनांचा, करिती उद्धार।।
चन्द्रहास म्हणे, पुण्य हे अपार।
श्रीगुरू सांगती, निर्गुणाचे सार।।

### अंबानाम-महात्म्य

नाव घेता रेणुकेचे। पापे जळती रे सारे।
थांबवोनी चित्तवृत्ती। मोक्ष उघडितो दारे।।
रहावे रे गुण्यागोविंदे। न करावे आरे कारे।
नाही कधी रे शमते। वैराच्या साधने वैरे।।
ऋद्धी सिद्धी अंबा नामे। मंत्र एक मनी धरे।
चन्द्रहास म्हणे माये। चारा भरवी पाखरे।।
थकला गं जीव माये। आस शिवाची गं धरे।
येई तुझिया आश्रये। कष्ट भोगूनी संसारे।।
नाम तुझे चित्ती स्मरे। त्यासी सत्वरी उद्धारे।
जीव भ्रमला जीवने। पाहोनिया भ्रम सारे।।
प्रत्यक्ष त्वा महामाये। निर्मिले विक्षेप सारे।
चन्द्रहास म्हणे माये। दावी पाय एकवीरे।।


### ठेवी लक्ष दासावरी।।

होता संचार अंबेचा। विघ्ने होय भूई थोडी।
मिटे पसारा मायेचा। प्रलयात वाचे होडी।।
अंबेने दिधले मला। भक्ती करण्या जीवना।
निरंतर तिची कृपा। थोर तिचा दातेपणा।।
रात्रंदिने गाये जरी। कल्पांती सरेना कदा।
ऐसा अंबेचा महिमा। मुखे आळवावा सदा।।
नाही पेलवत मला। आता ओझे डोईवरी।
चंद्रहास म्हणे माये। ठेवी लक्ष दासावरी।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



### अनिर्वाच्य निरुपण

आधुनिक केसरी

आतापर्यंत आपण मायेचे अस्तित्व जाणले. आता आपण 37 व्या ओवीत समर्थ आपल्याला काय बोध देतात ते पाहूया. मूळ स्वयंप्रकाश आत्मस्वरूप स्वानंदात होते. यासाठी समर्थ झोप व स्वप्नाचें उदाहरण देतात. ते कसे पहा. झोप लागली म्हणजे माणसाला स्वस्वरूपाचा विसर पडला. झोपेत स्वप्न पडले म्हणजे आपण देहरूप आहोत हा भास होऊन सर्वत्र भेदाने भरलेले विश्व दिसु लागते. मानवी मनाच्या व संसाराच्या काळज्या दुःख यामुळे त्याला भय वाटते. आताच्या झोपेच्या अवस्थेत व स्वप्नात तो भगवंताला शरण् जातोसद्गुरूला शरण् जातो. हा सगळा द्रुष्यातील आपल्या कल्पनेचा व्यवहार आहे. झोपेतला माणूस जागा झाला की त्याला झोपेत पाहिलेल्या गोष्टी व्यर्थ वाटू लागतात.देहबुद्धी मरून अज्ञान संपले कीआहे आणि नाही हा मनाचा खेळ चालू होतो. आत्मस्वरूप आहे व नाही या मानवी मनाच्या कल्पनेच्या पलीकडे आहे.ते केवळ असते. शुध्द असणे हा त्याच स्वभाव आहे. त्यालाच सत्ता असे म्हणतात. आहे आणि नाही यात सामावलेले सारे विश्व लय पावले संपले की शुन्य उरते. त्या शुन्याच्यापलीकडे शुध्द आत्मज्ञान असते. त्या ज्ञानाने समाधान होते. आपण स्वतः व आत्मा एकरूप आहोत या अभिन्नपणाच्या अनुभवाने सहजस्थिती प्राप्त होते. या अवस्थेत देहाचे सर्व व्यवहार होतात तरी स्वरूपाशी झालेले ऐक्य आहे तसेच रहाते म्हणून याला सहजस्थिती असे म्हणतात.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# त्याग हे यज्ञाचे खरे मर्म आहे

आधुनिक केसरी

सदाचरणाने राहणाऱ्या माणसाला खर्च कमी लागतो, कारण खऱ्या समाधानाने पोट भरले की अन्नही कमी लागते. मी हे वारंवार सांगतो, कारण सदाचारणाचे, नीतिधर्माचे आचरण, हा परमार्थाच्या इमारतीचा पाया आहे. पाया भक्कम नसेल तर त्यावरची इमारत जास्त दिवस टिकू शकणार नाही. त्याप्रमाणे नीति जर सांभाळली नाही, तर पुढच्या कर्माचा फारसा उपयोग होत नाही. परस्त्री मातेसमान माना, परद्रव्याची अभिलाषा बाळगू नका आणि परनिंदेला विष्ठा समजून त्याग करा. या तीन गोष्टींना फार सांभाळा. परमार्थाची इमारत या तीन गोष्टींवर उभी करायची आहे. नुसता पाया बांधून ज्याप्रमाणे घरात राहता येत नाही, त्याप्रमाणे पायाशिवाय इमारतही उभी करता येत नाही. 'राम कर्ता' ही भावना ठेवून नामात राहणे, म्हणजे परमार्थरूपी इमारतीत आनंदात राहणेच होय. व्यावहारिक मोठेपणा बाजूला ठेवा आणि देवाला अनन्यभावाने शरण जा. देवाला शरण जाताना सर्व विसरून जा. समजा एखादा माणूस नाटकात राजाचे काम करीत असला आणि नाटक संपल्यावरही तो घरी येऊन जर राजासारखे



वागू लागला, तर त्याचा व्यवहार बिघडून जाईल; त्याचप्रमाणे, देवाला शरण जाताना, मी मोठा भक्त, विद्वान, पैसावाला, ही सर्व नाती विसरून गेले पाहिजे. कर्माचे फळ आपल्या हातचे नाही म्हणून त्याची काळजी करू नये, हे समजले तरी, काळजी न करणे हे देखील आपल्या हातचे नाही म्हणून आपण काळजी करतोच ! यासाठीच भगवंताच्या नामात राहण्याची सवय करा. कर्म करणे यात विशेष नाही. आपल्याला कर्म केल्याशिवाय चैनच पडत नाही. 'कर्म करा' असे गीतेतही सांगितले आहेच. परंतु कर्म केल्याने पाहिजे ते फळ आपल्याला मिळतेच असे नाही. म्हणून भगवंताला स्मरून कर्म करा, आणि मग काय काय होते ते पहा. हेच निष्काम कर्म. भगवंताच्या इच्छेने सर्व घडते आहे ही भावना ठेवून आपले कर्तव्य करणे, हे सर्व गीतेचे सार आहे.

जो समजून त्याग करील त्याला फायदा होईल. नाहीतरी, संन्यास आणि त्याग दोन्ही आपल्याजवळ सुद्धा आहेत. भगवंताच्या बाबतीत आपण संन्यासी वृत्ति धारण करतो आणि आपण अपल्या आईबापाला सोडतो असा त्याग करतो ! हे काय कामाचे ? त्याग हे यज्ञाचे खरे मर्म आहे. भगवंताच्या प्राप्तीच्या आड जे जे येते ते ते टाकणे, म्हणजे यज्ञ करणे होय. या यज्ञामध्ये वासनांची आहुति द्यावी. कोणत्याच गोष्टीबद्दल हवे अगर नको असे न वाटणे, हेच वासनांची आहुती दिल्याचे लक्षण आहे.

बोधवचन : जेथे वासना संपली तेथेच भगवंताचे कृपा झाली .

**-श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर**

# एम.आय.एम.महिला आघाडीतर्फे जोडेमारो आंदोलन

## धुळे शहराच्या विकासाला खीळ घालणाऱ्या खासदार सुभाष भामरे व भाजपा पदाधिकाऱ्यांच्या विरोधात धिक्कार आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**आकाश सोनवणे**

**धुळे :** आमदार फारुक शहा यांचा विकासकामांचा धडाका सुरू असताना आमदार निधीला खासदार सुभाष भामरे यांनी स्थगिती देऊन अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे, असा आरोप शाह यांनी केला. त्यामुळे नागरिकांनी संतप्त होऊन विकास कामाला अडथळा आणणारे डॉक्टर सुभाष भामरे यांच्या प्रतिमेला चपलेचा हार घालून निषेध व्यक्त करण्यात आला. आ. फारुख शाह यांनी गेल्या ३ वर्षांपासून धुळे शहराच्या विकासासाठी करोडो रुपयांचा निधी आणला. प्रत्यक्षात शहराच्या मुलभूत सोयी सुविधांसाठी खर्च केला. आजपर्यंत अनेक आमदारांनी शहरवासियांना विकासाचे गाजर दाखविले. रस्ते, गटार, पाणी व रेशन, अन्न-धान्य मिळवून देण्याचे तसेच दिव्यांग, विधवा व गरिबांना न्याय देण्याचे काम आमदार फारुख शाह यांनी केले. धुळे शहराचा बट्याबोळ करून देवपूरला खड्डेपूर करणाऱ्या मनपा प्रशासनाचा व भाजपाविरुद्ध लोकांनी आमदारांना निवेदन दिले



होते की, शहरातील संपूर्ण रस्ते व्हावे त्यासंदर्भात आमदार फारुख शाह यांनी शासनाकडून ३० कोटींचा निधी मंजूर करून आणला होता. परंतु खासदार सुभाष भामरे व कंपनी या कामाला स्थगिती आणण्याचे पाप केले आहे. शहराच्या विकासाला विरोध करणाऱ्या खा. सुभाष भामरे यांच्या विरोधात आज एम.आय.एमच्या महिला आघाडीतर्फे धिक्कार आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात महिला अध्यक्ष डॉ. दीपश्री नाईक, फातेमा अन्सारी, अकिला पिंजारी, रेहाना पिंजारी, जिल्हाध्यक्ष नासीर पठाण, शहराध्यक्ष मुक्तार अन्सारी, रफीक पठाण, निजामदादा सय्यद, आसिफ मुल्ला, साजिद साई, सउद सरदार, शोएब मुल्ला, हलीम अन्सारी, वसिम पिंजारी, अकीब सय्यद, फैसल अन्सारी, हसीम अन्सारी व बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच या कामासंदर्भात आमदार फारुख शाह यांनी मुख्यमंत्री यांना स्थगिती उठविण्यासंदर्भात पत्र दिलेले आहे. दि.२५/१०/२०२१ रोजीच्या पत्रानुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती (राज्यस्तरीय) योजने अंतर्गत मी ३० कोटी निधीची मागणी केली होती. त्यानुसार शासनाने धुळे मनपाला नगर विकास विभाग, कक्ष अधिकारी, यांचे पत्र क्रमांकः-नगरो-२०२१/प्र.क्र.३०३/नवि-३३. नुसार सविस्तर प्रस्ताव तयार करणेबाबत कळविले. धुळे महानगरपालिकेने कामाच्या निश्चितीबाबत व मनपाचा हिस्सा अदा करणेबाबतचा ठराव दि.२७-०१-२०२२ रोजी केला आणि ठरावासह सविस्तर प्रस्ताव तयार करून नगरपरिषद संचालनालयास सादर केला. दि.१२ ऑगस्ट २०२२ रोजी झालेल्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत प्रकल्प मान्यता व संनियंत्रण समितीच्या बैठकीद्वारे महानगरपालिकेच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. आणि नगर विकास विभाग, प्रशासकीय मान्यता शासन निर्णय, क्रमांकः-नगरो-२०२२/प्र.क्र.२३७/नवि-३३. नगर विकास विभागाकडून १ ते ४४ कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. दि.२०/०९/२०२२ च्या प्रशासकीय आदेशानुसार धुळे महानगरपालिकेने ई-निविदा सूचना क्रमांक- ११६ सन २०२२-२३ जा.क्र.धुमपा/बांवि/८६/२०२२-२३ दि.०६/१०/२०२२अन्वये १-४४ कामांची ई-निविदा दि.०७/१०/२०२२ रोजीच्या दै.लोकमतमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. मात्र दि.१३ ऑक्टोबर २०२२ च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान धुळे शहराच्या रस्ते विकास प्रकल्पाच्या प्रशासकीय मान्यतेस स्थगिती देण्यात आलेली आहे. सुमारे १२ महिने चाललेल्या या प्रक्रियेत महानगरपालिका, सा.बां. विभाग, मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नासिक, नगरपरिषद संचालनालय व नगरविकास विभाग मंत्रालय या सर्वांचा महत्वाचा सहभाग होता.यासाठी शासकीय अधिकाऱ्यांचा बहुमुल्य वेळ आणि शासनाचा पैसा देखील खर्च झालेला आहे. नागरिकांच्या मागणी वरून मी शासनाकडे ३० कोटी निधीची मागणी केलेली होती. परंतु काही लोक प्रतिनिधींच्या अट्टहासामुळे धुळेकर विकासापासून वंचित राहणार आहेत, असे पत्र आमदार फारुख शाह यांनी मुख्यमंत्री एकनाथ यांना केले आहे.



# विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्या उपस्थितीत कन्नड येथे रास्ता रोको

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील कन्नड चाळीसगाव औट्रम घाटाचा बोगदा कित्येक दिवसांपासून प्रलंबित आहे. यामुळे सतत वाहतूक कोंडी होत असून वाहन चालकाला नाहक मनस्ताप सोसावा लागत आहे. ही कोंडी फोडून काढण्यासाठी घाटाचा बोगदा लवकर करावा या मागणीसाठी महाराष्ट्राचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी रस्ता रोको आंदोलन केले. आंदोलनप्रसंगी पोलिसांचा चोख बंदोबस्त होता. यावेळी अंबादास दानवे म्हणाले की, वाहनांची ही लांबच लांब रांग दिसून येत आहे. हा रस्ता जर झाला तर वाहतुक कोंडी होणार नाही व वाहतुकही सुरळीत झाल्यावर तासनतास घाट जाम होणार नाही. या अंदोलनात राजू राठोड, अवचित वळवळे, तालुका अध्यक्ष संजय मोटे, शहर प्रमुख सुनिल पवार, डॉ. सदाशिव पाटील, शिवाजी थेटे, अशोक दापके, बाबासाहेब मोहीते, संजय शिंदे इत्यादी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

# मोहाळ येथे आदिवासी जनजागृती मेळावा; शाखेचे अनावरण उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**अजिंठा :** सिल्लोड तालुक्यातील मोहाळ येथे महाराष्ट्र एकलव्य आदिवासी तडवी भिल्ल विकास परिषद या आदिवासी सामाजिक संघटनेतर्फे आदिवासी समाजाचा जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला आणि शाखेचे अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमादरम्यान जळकी बाजार, अजिंठा, नाटवी, वाघेरा आणि अंभई या परिसरातील सर्व गावांतील आदिवासी समाजाचे समाज बांधव आणि भगिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. याप्रसंगी मोहाळ गावचे सरपंच भगवान जवखेडे यांनी या कार्यक्रमादरम्यान मार्गदर्शन केले तसेच महाराष्ट्र एकलव्य आदिवासी तडवी भिल्ल विकास परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अफसर तडवी यांनी आदिवासी समाजाला आदिवासी विभागाच्या विविध योजनांविषयी आणि आदिवासी समाजावर होणाऱ्या अन्याया विरुद्ध कसे लढावे, नेहमी निडर होऊन कसे जगावे असे मार्गदर्शन यावेळेस केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. समीर तडवी यांनी केले या कार्यक्रमादरम्यान औरंगाबाद जिल्हा अध्यक्ष ॲड. नजीर तडवी, मराठवाडा संघटक इरफान तडवी, सिल्लोड तालुका अध्यक्ष सलाउद्दीन तडवी ग्रामीण, एकबाल तडवी सिल्लोड तालुका अध्यक्ष अजिंठा, मोसीन तडवी घाटनांद्रा, मुजीब तडवी, घाटनांद्रा मुकद्दर तडवी घाटनांद्रा, छब्बीर तडवी वाघेरा, अनवर तडवी वाघेरा, समशेर तडवी मादणी, नजमुद्दीन तडवी मादणी, रहेमान तडवी हट्टी, रज्जाक तडवी अजिंठा, रफिक तडवी नाटवी, अमीन तडवी कुंभारी असे अनेक आदिवासी समाजाचे समाज बांधव आणि भगीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते, अशी माहिती सिल्लोड तालुकाध्यक्ष सलाउद्दिन तडवी यांनी प्रसारमाध्यमांना दिली.



# निसर्ग, माणूस यांच्यावर आस्था असेल तरच साहित्य निर्माण होते

## डॉ. अरुणा ढेरे : डॉ. विक्रम लोखंडे लिखित 'वन पेज स्टोरी' पुस्तकाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जीवन जगताना अनेक छोटे छोटे संवेदनशिल अनुभव आपल्याला समृध्द करत असतात. हे अनुभव वेचायचे असतात.डॉ.विक्रम लोखंडे यांनी हे अनुभव अलगद चिमटीत उचलून'वन पेज स्टोरी'च्या माध्यमातून मांडले आहेत.त्यामुळे यातून डॉक्टरमधील माणूस लक्षात येतो.त्यांच्या प्रत्येक कथेतून माणुसकीचे दर्शन घडते.प्रत्येक व्यक्तीच्या चेहऱ्यावर एक नवीन गोष्ट असते.निसर्ग आणि माणसाविषयी आस्था असेल तरच साहित्य निर्माण होत असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखिका आणि कवियत्री डॉ.अरुणा ढेरे यांनी केले.डॉ.विक्रम लोखंडे लिखित'वन पेज स्टोरी'या कथासंग्रहाच्या प्रकाशन समारंभाच्या प्रसंगी त्या बोलत होत्या. एमजीएम महाविद्यालयाच्या रुख्मीणी सभागृहात प्रकाशन समारंभ पार पडला. यावेळी कार्यक्रम अध्यक्षा जेष्ठ लेखिका तथा कवयित्री डॉ. अरुणा ढेरे ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून भोकरदनचे आमदार संतोष पाटील दानवे, प्रसिध्द लेखक आणि पटकथाकार अरविंद जगताप, साकेत प्रकाशनचे बाबा भांड, साकेत भांड यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणात डॉ.अरुणा ढेरे म्हणाल्या की, डॉ. विक्रम लोखंडे यांचे लिखाण केवळ हौसेपोटी केलेले आहे असे कुठेच वाटत नाही.डॉक्टरीपेशात असताना अनेक अनुभव येत असतात त्यातून समृध्दता येते हीच समृध्दता त्यांच्या लिखाणातून सतत जाणवत राहते. त्यांनी एका पानात मांडलेल्या कथा जिवनानुभव देतात. एक लेखक म्हणून जीवनाच्या अधिक जवळ जाण्याचा प्रयत्न त्यांच्या कथेमधून जाणवतो असेही डॉ. अरुणा ढेरे म्हणाल्या. प्रास्ताविकपर भाषणात साकेत प्रकाशनचे बाबा भांड यांनी कथा संग्रहाचा हा नवा प्रकार प्रकाशक म्हणून खूप भावला असे प्रतिपादन केले. प्रत्येक क्षेत्रात ग्रंथांचे महत्त्व असते. त्यामुळे लेखक व ग्रंथांना आदर मिळतो.साहित्य,



कला, संस्कृती ही राष्ट्राची संपत्ती आहे. डॉ. लोखंडे हे वैद्यकीय क्षेत्रातील एक नामांकित सर्जन आहेत. परंतु त्यांचे लिखानही तेवढच सृजनशील असल्याचे मत बाबा भांड यांनी व्यक्त केले. डॉ. विक्रम लोखंडे यांनी मानवी जिवनातील नात्यांची वीण पुस्तकाच्या माध्यमातून उलगडून दाखवली आहे असे सांगून त्यांच्या लिखाणातून माणसं जिवंत होतात असे प्रतिपादन प्रसिद्ध पटकथा लेखक तथा कथाकार अरविंद जगताप यांनी केले.जेष्ठ साहित्यीक आणि समाजाने नवलेखकांना प्रोत्साहन दिले पाहिजे. प्रोत्साहन न दिल्याने लेखक आणि वाचक निराश होतो.वाचन संस्कृती टिकली पाहिजे. माणसाला समजून लेखन व्हायला हवे. डॉ. लोखंडे यांच्या कथा अप्रतिम आहेत असेही अरविंद जगताप म्हणाले.

तर आमदार संतोष दानवे म्हणाले की लोकप्रतिनिधी म्हणून रोजच भाषणे करावी लागतात परंतु आजचा कार्यक्रम वेगळा आहे याची मला जाणीव आहे.'वन पेज स्टोरी'या पुस्तकातून दैनंदिन जीवनातील अनुभव आणि सामान्य माणसाच्या आयुष्यातील भाव-भावना चित्रित झाल्याचे दिसून येते. प्रत्येक कथेला एक नैतिक अधिष्ठान प्राप्त झाले आहे. आमच्या परिवारातील एका सदस्यांने हे पहिलेच पुस्तक लिहिलं याचा मला आनंद होतोय असे मत आमदार संतोष दानवे यांनी व्यक्त करून डॉ.लोखंडे यांना शुभेच्छा दिल्या.

# गोतस्करांना बसणार चाप

आधुनिक केसरी

जप्त केलेले गोमांस हे खरंच बीफ आहे की अन्य हे तपासण्यासाठी गुजरात सरकारने एक नवीन पर्याय शोधला आहे. गोमांस तस्करीच्या संशयावरुन अनेकदा पोलिसांकडून मालावर जप्ती आणण्यात येते. आता जप्त करण्यात आलेले मांस हे गोमांसच आहे का याची खात्री करण्यासाठी आता चाचणी करण्यात येणार आहे. या चाचणीमुळे आता एका तासांच्या आत या चाचणीचा निकाल येणार आहे. लॅम्प डीएनए चाचणी असे या पद्धतीचे नाव असून अशी चाचणी करणारे गुजरात हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. गुजरातमधील अहमदाबाद आणि गांधीनगरमध्ये मर्यादित क्षमतेत ही चाचणी सुर करण्यात आली आहे. सेरोलॉजिकल विश्लेषण आणि डीएनए विश्लेषण यांसारख्या पारंपारिक पद्धतींना लॅम्प डीएनए चाचणी हा चांगला पर्याय आहे. वरील दोन्ही चाचणीत एक दिवसांपेक्षा अधिक कालावधी लागत होता. मात्र, लॅम्प डीएनए चाचणीसाठी एका तासांचा कालावधी लागणार आहे. निंकुज ब्रह्मभट्ट हे एनएफएसयूचे वरिष्ठ प्राध्यापक आहेत. ब्रह्मभट्ट यांच्या शोधप्रबंधात त्यांनी Development of Loop-mediated Isothermal Amplification (LAMP) यावर सखोल संशोधन केलं आहे. प्राण्यांची अंतर-प्रजाती फॉरेन्सिक तपासणी' करण्यासाठी लॅम्पचा वापर केला जातो. २०२०मध्ये त्यांनी प्राध्यापक विवेक उपासनी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचा शोधप्रबंध पूर्ण केला आहे. दरम्यान, ही पद्धत वापरणारे गुजरात हे पहिलेच राज्य असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. यापूर्वी गोमांसाची चाचणी करताना गोळा केलेले नुमने बराच काळ उष्णतेच्या संपर्कात राहिले किंवा जप्तीच्या दीर्घ कालावधीनंतर त्याचे विश्लेषण केले गेले तर त्याचा अहवालावर परिणाम होतो, असे ब्रह्मभट्ट यांनी म्हटले आहे. LAMP DNA पद्धतीचा वापर करून, प्रयोगशाळेत केलेल्या चाचणीच्या इतर पद्धतींप्रमाणे नमुन्याचे जागेवरच विश्लेषण केले जाऊ शकते. ही चाचणी अगदी लहान किंवा शिजवलेल्या मांसाच्या नमुन्यांमधूनही गोमांस ओळखू शकते. कधीकधी जप्त केलेल्या नमुन्यांमध्ये एकापेक्षा जास्त प्रकार असू शकतात, असेही ते म्हणाले.



# फुरोगामी विषारवंतांचे फुत्कार !



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

आधुनिक केसरी

**.अलीकडील काळात स्वतःला विचारवंत म्हणवणारे , साहित्यिक म्हणून आव आणणारे आणि आपल्या राजकीय पितृत्वाची बेमालूमपणे मिश्रण करणारी एक पोटभरू जमात महाराष्ट्रात निर्माण झाली आहे. आपल्या राजकीय आश्रयदात्याला खुश करण्याचा धंदा त्यांचा तेजीत आहे . उन्मादी लोकांच्या समोर बसलेल्या जमावाच्या हशा आणि टाळ्या मिळाल्या की हे खुश असतात. पत्रकारांनी प्रसिद्धी दिली की त्यांची अवस्था आधीच मर्कट, त्यात भुताने पछाडले, त्यात मद्य प्याला अशी होते.**

महाराष्ट्र हा भविष्याचा विचार करणारा भूभाग मानला जातो. या प्रदेशातील विचारकांची मांदियाळीला दीर्घ परंपरा आहे. भगवत् गीता सामान्यांना समजावी म्हणून माय मराठीत त्याचा अमुतानुभव ज्ञानेश्वरी लिहून देणारे संत माऊली इथले आणि आपल्या गाथेतून परंपरा आणि कर्मकांड यातील दोषांवर आसूड ओढताना पांडुरंगाची ओढ मात्र भाविकांना लावणारे संत तुकाराम महाराज याच भूमीतले.

विचारांना कर्माची जोड देणारे शिक्षण क्षेत्रातील कर्मयोगी भाऊराव पाटील, स्वछतेचे दूत संत गाडगे महाराज आणि स्त्री शिक्षणाचा ध्यास घेतलेले महात्मा ज्योतिबा फुले आणि महर्षी कर्वे आणि पीडितांना, दलितांना सर्वप्रथम आरक्षण देणारे शाहू महाराज याच मातीतले. दलितांना चळवळ आणि विचार दोन्ही माध्यमातून हक्क प्रदान करणारे महामानव बाबासाहेब आंबेडकर आणि विठ्ठल रामजी शिंदे याच मातीतले. १८५७ चे स्वातंत्र्य युद्ध होते शिपायचे बंड नव्हे हे सप्रमाण सिद्ध करणारे सावरकर, गीता रहस्य लिहणारे लोकमान्य ही सगळी मंडळी वेगवेगळ्या आणि समकालीन काळात जन्म घेतलेली पण प्रत्येकाने आपल्या पद्धत्तीने समाजाच्या उत्कर्षाचा प्रामाणिक प्रयत्न केलेले . कुठलीही साहित्य संपदा निर्माण न करता तत्व हे व्यवहारात आणणारे डॉक्टर हेडगेवार या मातीतलेच.

याच परंपरेत पुढे महाराष्ट्रात साहित्य संपदा रुजली, वाढली आणि त्यातून विचारवंतांच्या आणि साहित्यिकांची एक समृद्ध वाटचाल सुरू झाली. त्यामुळे ज्ञानपीठ पुरस्कार सारखे पुरस्कार महाराष्ट्राच्या वाटेला अनेक वेळा आले. वि. स. खांडेकर, ना. सी. फडके यांच्या पासून केशवसुत, कुसुमाग्रज, बा. भ. बोरकर, विं. दा.पर्यंत कवी, कानेटकर, दळवी यांच्यासारखे नाटककार, साहित्याच्या माध्यमातून आपल्या अत्याचारांना वाचा फोडणारे नामदेव ढसाळ, दया पवार हे सगळे कुठल्याही विचारविश्वाचे प्रतिनिधी होते तरी त्यांना सर्वांनीच स्वीकारले होते.

पण अलीकडील काळात स्वतःला विचारवंत म्हणवणारे , साहित्यिक म्हणून आव आणणारे आणि आपल्या राजकीय पितृत्वाची बेमालूमपणे मिश्रण करणारी एक पोटभरू जमात महाराष्ट्रात निर्माण झाली आहे. आपल्या राजकीय आश्रयदात्याला खुश करण्याचा धंदा त्यांचा तेजीत आहे . उन्मादी लोकांच्या समोर बसलेल्या जमावाच्या हशा आणि टाळ्या मिळाल्या की हे खुश असतात. पत्रकारांनी प्रसिद्धी दिली की त्यांची अवस्था आधीच मर्कट, त्यात भुताने पछाडले, त्यात मद्य प्याला अशी होते.

यात अजून एक मिश्रण असते ते म्हणजे यातले काही स्वतःला पत्रकार समजत असतात. बाळशास्त्री जांभेकरांनी ओशाळून जावे, तळवलकर, गोखले, गडकरी याना लाज वाटावी असे हे सगळी मंडळी गिधाडी वृत्तीने सावज शोधत असतात आणि समाजाला जातीच्या वणव्यात ढकलून देत असतात. हिंदुत्वाची प्रतीके नाकारायची, ती संकुचित ठरवायची आणि जातींची बेटे तयार करायची ही या विचारवंत पत्रकार साहित्यिक मंडळींची नेहमीची खेळी झाली आहे. साहित्याची अनुदान लाटत, सरकारी पुरस्कार मिरवत यांनी अनेक संस्था आणि उपक्रम याना वाईट वळण या लोकांनी लावले. साहित्य सम्मेलने यांनी बळकावली आणि तेथे विद्रोहाच्या नावाखाली कधी शूर्पणखा , कधी रावण याना समाजापुढे आदर्श म्हणून आणण्याचा प्रयत्न केला आहे, करत आहेत.

स्वातंत्र्यवीर सावरकर याना त्यांच्या हयातीत जेव्हढा विरोध झाला नाही तितका विरोध आणि बदनामी अलीकडील



काळात या विषारवंतांनी त्यांची केली आणि याच प्रेरणेतून एक साहित्यिक पत्रकार बरळला की बहुसंख्य पूर्वीचे लेखक ब्राह्मणी आणि सावरकर भक्त होते त्यांनी गांधी नाकारले म्हणे !

हे महाभाग चार्वाकाचे अभ्यासक म्हणवतात आणि गांधीवादी म्हणून पण मिरवतात. गांधीजींनी त्यागाची शिकवण हा हिंदू परंपरेचा गाभा सांगितले आणि रामराज्य कल्पना मांडताना रामाला स्वीकारले. यांनी गांधींना स्वीकारताना त्यांच्या हिंदू श्रद्धांना नाकारले हा दुहेरी पणा असले ढोंगी लोकच करू जाणे.

गीतरामायण कार ग. दि. माडगूळकर प्रत्यक्ष मराठीतील वाल्मिकी हे महात्मा गांधी यांचे अनुयायी ! त्यांना या बोलण्याच्या वेदना स्वर्गात पण जाणवल्या असतील . लोकमान्य गेल्यावर समस्त देशाने गांधी स्वीकारले तसेच महाराष्ट्राने पण स्वीकारले. परंतु गांधीजी यांच्या नावाने , बाबासाहेब, फुले, शाहू यांच्या नावाने ज्यांना राजकारण करायचे आहे त्यांच्या इशाऱ्यावर चालणारे हे बाजार बुणगे विषारी फुत्कार टाकून मोकळे झाले . आणि असे फुत्कार टाकणारे म्हणे साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होऊ घातले आहेत. असे साहित्य सम्मेलनावर बहिष्कार टाकणे हाच एक पर्याय आहे.

दुसरे असेच महाभाग थेट अब्दुल कलाम यांच्या वरच घसरले. स्वतःला उपासना पद्धत्तीने मुस्लिम समजणारे पण भारतीय परंपरा मानणारे, हिंदू संस्कृती जाणून घेणारे अब्दुल कलाम ! त्यांची पुस्तके तरुणांच्या आकांक्षा आणि महत्वाकांक्षा याना बळ देणारे. राष्ट्रपती भवन सोडताना त्यांच्या बरोबर फक्त पुस्तके होती. आशा भारत मातेच्या सुपुत्रासाठी वाचक पुस्तक दिन साजरा होतो आहे हे महाराष्ट्रातील एका नावात हरी असलेल्याला माणसाला डाचावे , खुपावे या सारखा दैव दुर्विलास कोणता? असा अपमान, पुरोगामी महाराष्ट्राचा कुणी केला नसेल.

अब्दुल कलाम हे म्हणे इंजिनीअर होते, वैज्ञानिक नव्हते असे यांचे म्हणणे. इंजिनीअर वैज्ञानिक नसतो हे बोलून विश्वेश्वरय्या यांच्या पासून तमाम वैज्ञानिक अभियंत्यांच्या संशोधनाचा अपमान करण्याचा अधिकार या विखार वंताला कुणी दिला? हिंदुत्वाचा विचाराच्या विद्वेषाने ही मंडळी आंधळे, बहिरे तर झालेच आहेत, तोंडाने मात्र बेताल झाले आहेत.

अर्थात भ्रष्टाचार सिद्ध झालेल्या राजकारण्यांच्या कार्यक्रमात त्यांच्यावर स्तुति सुमने उधळणारे, संत रामदासांना अपमानित करणारे आणखी कुठले वैचारिक दिवे लावणार? याना महापुरुषांना जातीच्या अभिनेवेशात अडकवून महाराष्ट्रात अंधकारच निर्माण करायचा आहे.

महाराष्ट्रात साहित्यिक आणि वैचारिक अंधकार निर्माण करणारे आणि राजकारण्यांचे हातचे बाहुले बनलेले ही मंडळी वास्तविक सामाजिक जीवनात कालबाह्य झाली आहेत . बळकवलेल्या संस्था आणि लाचारीतून पटकावलेले पुरस्कार वगळता यांच्याकडे कुठलेही भांडवल नाही . समाजाने नाकारल्या मुळे आलेल्या विमनस्क अवस्थेतून आणि त्यांच्या राजकीय पितृत्वाच्या नैराश्येतून असे विखारी विचार हे विषारवंत मांडत आहे. सार्वजनिक जीवनात त्यांना नाकारणे हे गरजेचे आहे अन्यथा जातीय वणव्यात महाराष्ट्राला रसातळाला हे नेऊन ठेवतील !

अर्थात छत्रपती शिवाजी महाराजांची पुण्याई अजून टिकून आहे . संतांची परंपरा महाराष्ट्राने जपली आहे . आणीबाणीतील सेन्सॉर शिपला कडाडून विरोध करताना कुठलीही भीती न बाळगणारे साहित्यिक आणि पत्रकार दुर्गा भागवत, पू. ल. देशपांडे, ग. वा. बेहरे यांचा हा महाराष्ट्र आहे. त्यामुळे ही वैचारिक विषाची घुटी पचवून राकट दगडातून जन्मलेला महाराष्ट्र , सह्याद्रीच्या कणखरते प्रमाणे उभा राहील आणि भारताच्या उज्वल भविष्यात आपली भूमिका पार पाडेल यात शंका नाही !

# समाजव्यवस्थेचा पर्दाफाश करणाऱ्या : बेबीताई कांबळे

आधुनिक केसरी

**वर्षानुवर्ष शासन व्यवस्था नष्ट करण्यासाठी, सर्व शोषन करणाऱ्या शक्तींना कडवे आव्हान देणारे असे अनेक लेखक, विचारवंत, शिक्षक आणि समाजसुधारक शतकानुशतके त्यांच्या लेखणीने मानवजातीचा इतिहास बदलण्यासाठी धडपडत आले. त्याप्रमाणे लेखणीद्वारे आपला आवाज जगासमोर घेऊन अनेकांच्या कथा लिहून शतकानुशतके जीर्ण झालेल्या समाजव्यवस्थेचा पर्दाफाश करणाऱ्या बेबीताई कांबळे यांचा जन्म 1929 साली महाराष्ट्रातील एका मागासवर्गीय कुटुंबात झाला.**

त्यांचे पूर्वज इतर मागासवर्गीय कुटुंबांपेक्षा उच्चभ्रू होते कारण ते ब्रिटिश अधिकाऱ्यांचे खास नोकर होते. वडील मजुराचे कंत्राटदार म्हणून काम करत होते आणि ते बहुतेक बाहेरचे असल्यामुळे, बेबीताई वीरगाव जिल्ह्यात त्यांच्या आजी आजोबांसोबत राहत होत्या. त्याचा जन्म होताच त्या खूप आजारी होवून आणि बेशुद्ध झाल्या लोकांना वाटले की, त्या मृत पावल्या म्हणून अंत्यसंस्कार करण्याच्यासाठी सरसावले पण त्याच्या आईने हे होऊ दिले नाही आणि मृत्यूनंतरही आपली मुलगी सोबतच राहणार असल्याचे सांगितले. आणि थोड्या वेळाने बेबी ताई शुद्धीवर आल्या तेव्हा लोकांना वाटले की देवाचा चमत्कार असे समजून त्यांची पूजा करू लागले.

बेबीताई चौथीपर्यंत शिकल्या, वयाच्या १३ व्या वर्षी लग्न झाले. त्या काळात समाजातील मुलींची लग्ने सात ते दहा वर्षांच्या वयात होत असत, त्यानुसार त्यांना खूप उशीर झाला होता. त्याच्या मोठ्या भावाच्या वर्गमित्राने त्याला पसंती दिली आणि 'गंधर्व पद्धतीने विवाह' संपन्न झाला.

"बाबासाहेब म्हणाले होते की, विवाह गंधर्व विवाहानुसार व्हावेत. हिंदू प्रथा-ब्राह्मण पुजारी-दान-दक्षिणा किंवा उधळपट्टी टाळा. त्यानुसारच झाले समाजातील एकजण आणि त्यांच्या भावाने हिंदू देवतेची नव्हे तर बाबासाहेब आंबेडकरांची



स्तुतीसुमनाने लग्नाचे मंत्र लिहिले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होवून. कांबळे कुटुंबाने बौद्ध धर्म स्वीकारुन आयुष्यभर बौद्ध धर्माचे पालन केले.

बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा बेबीताईवर लहानपणापासूनच प्रभाव होता. बेबीताई आणि त्यांच्यासारख्या हजारो मागासवर्गीय महिलांवर विचारसरणीचा आणि कार्याचा प्रभाव पडला होता. एका मुलाखतीत बेबी ताई म्हणत "बाबासाहेबांच्या भाषणांचा प्रभाव पुरुषांपेक्षा आम्हां स्त्रियांवर जास्त पडला. आपल्या मुलांना शाळेत पाठवण्याबाबत ते सांगत. पुरुष म्हणायचे, 'आमची पोरं शाळेत गेल्यावर काय करणार? कोणी मोठा अधिकारी होईल का? आमच्यासारखे काम करून थोडे पैसे कमावले तर बरे.'

पण बाबासाहेब म्हणत 'तुम्ही देवावर श्रद्धा ठेवली आहे. तुम्ही पिढ्यानपिढ्या त्याच्यावर अवलंबून आहात. आता मलाही एक पिढी द्या. 20 वर्षे थोडे कष्ट घ्या आणि मुलांना शाळेत पाठवा. तुम्ही स्वतः उपाशी मराल, पण तुमच्या मुलांना शिक्षण द्या. वीस वर्षांनंतर तुम्हीच मला सांगाल की मोठा कोण - देव की शिक्षण...

त्यांचे म्हणणे ऐकून बेबी ताईंनी आणि इतर महिलांनी मुलांना शाळेत पाठवले आणि नंतर ते मुलं सर्व यशस्वी, उच्चशिक्षित पिढी बनले.

बेबीताई दलित लेखिका आणि आंबेडकरवादी विचारवंत होत्या. 2009 मध्ये त्यांचे 'जिणं आमुचं' हे आत्मचरित्र कादंबरी स्वरूपात प्रकाशित झाले. 'द प्रिझन्स वी ब्रोक' या नावाने इंग्रजीत अनुवादित मराठीत लिहिलेली ही कादंबरी बेबीताईंचे आत्मचरित्र तर आहेच, शिवाय जातिवाद आणि पुरुषीपणाच्या दुहेरी भाराखाली दबलेल्या तमाम बहुजन स्त्रियांची कथा आहे. कथा कागदावर उतरवून बेबीताई या सर्व महिलांचा आवाज बनल्या आणि मराठी साहित्यातील पहिल्यालेखिका म्हणून त्या प्रसिद्ध झाल्या.

वर्षा सोनकांबळे

त्यांच्या लिखित "जिणं आमुचं' आत्मचरित्रात बेबीताई बहुजन महिलांच्या जीवनातील अनेक गोष्टीना उजाळा देतात. मुलांना शाळेत पाठवण्यासाठी एका महिलेला कोणत्या प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागला हे सांगताना. घरातील उरलेलं धान्य कसं विकले, प्रसंगी नवऱ्यानं मारले, महिने उपाशी राहिले पण मुलांच्या अभ्यासात कुठलाही अडथळा येऊ दिला नाही. तसेच महिलांबद्दल बोलताना त्या नमूद करतात की बाळंतपणानंतर पोटदुखी कमी करण्यासाठी कठोर ज्वारी खावी लागत कारण त्यांना औषधे आणि उपलब्ध अन्न मिळत नसे. उच्चवर्णीयांच्या परिसरातून जात असताना मागासवर्गीय महिलांना मान खाली झुकावी लागे आणि जर एखाद्या महिलेने असे केले नाही तर तिला हिणवले जाई. स्त्रिया जेव्हा लाकड विकायला जायच्या तेव्हा उच्चवर्णीय स्त्रिया हातात एक दोन नाणी देण्याऐवजी दुरून फेकत असत. बेबीताई कांबळे यांच्या 'द प्रिझन्स वी ब्रोक'ने भारतीय साहित्यातील मागासवर्गीयांचे पारंपारिक, जातीय प्रतिनिधित्व मोडून काढले. त्या महिलांना आवाज बनल्या. स्त्रियांसाठी स्वातंत्र्य, समानता आणि आत्म-अभिव्यक्तीचा वारसा मागे ठेवून जाणाऱ्या बेबीताई कांबळे यांच्या कार्याला नमन.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# दिवाळी... आमच्या घरी अन् तुमच्या घरी



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**दिवाळी जवळ आली की बाजार पेठा फुलू लागतात. आताही बाजार पेठा फुललेल्या आहेत रंग, रांगोळ्या, आकाश दिवे, फटाके, फराळाचे पदार्थ, झेंडूची फुले, शेवंतीच्या वेण्या,गजरे, आदी गोष्टींची बाजारपेठेत रेलचेल असते. ती आताही बघायला मिळत आहे. नाट्यगृह, सिनेमागृह, हॉटेल्स, मॉल्स, या ठिकाणी गर्दी बघायला मिळत आहे.रस्ते अक्षरशः वाहू लागले आहेत. दिवाळी म्हणजे आनंदोत्सव. मनाला आनंद यातून मिळत असतो.**

दिवाळी येणार. अंगण सजणार. आनंद फुलणार घरोघरी. आमच्या घरी... अन तुमच्या घरी.
सनईच्या सुरात होईल पहाट. अत्तराचे पाणी स्नानाचा थाट, गोड गोड फराळ पंगतीला. आवडती सारी संगतीला. फुलबाज्या झडतील. फटाके फुटतील.. आमच्या घरी अन तुमच्या घरी..
दिवाळी जवळ आली की बाजार पेठा फुलू लागतात. आताही बाजार पेठा फुललेल्या आहेत रंग, रांगोळ्या, आकाश दिवे, फटाके, फराळाचे पदार्थ, झेंडूची फुले, शेवंतीच्या वेण्या,गजरे, आदी गोष्टींची बाजारपेठेत रेलचेल असते. ती आताही बघायला मिळत आहे. नाट्यगृह, सिनेमागृह, हॉटेल्स, मॉल्स, या ठिकाणी गर्दी बघायला मिळत आहे.रस्ते अक्षरशः वाहू लागले आहेत. दिवाळी म्हणजे आनंदोत्सव. मनाला आनंद यातून मिळत असतो. दिवाळी म्हणजे फराळ, फटाके, कपडे खरेदी, वाचनासाठी दिवाळी अंक, एकमेकांच्या गाठीभेटी. दिवाळी निमित्ताने आणि दिवाळी ही पर्यटन स्थळी साजरी करण्याचे बेत हे सगळं बघायला मिळतं. साधारणपणे कराष्टमी पासूनच दिवाळीची सुरुवात होते असे म्हणायला हरकत नाही. कारण त्याच दिवशी अनेक ठिकाणी आणि घरांवर विद्युत रोषणाई आकाश दिवे लावले जातात.
लहानपणी आम्ही पण घरीच आकर्षक दिवा बनवत होतो. आता त्या गोष्टीला पंचेचाळीस पन्नास वर्षाचा काळ लोटला. त्यावेळी बहुतेक ठिकाणी आकाश दिवे हे घरीच बनवले जात होते.पंधरा दिवस आधी हा कार्यक्रम सुरु व्हायचा.
परंतु आता बाजारात निरनिराळ्या प्रकारचे आकर्षक आणि त्यात विजेची दिवे लावून मिळतात. तसेच वेगवेगळ्या प्रकारात,रंगाचे असतात, त्यामुळे आता शक्यतोवर घरी कोणीच आकाश दिवे बनवत नाहीत.
हीच परिस्थिती फराळाची आहे काही वर्षापूर्वी घरोघरी चकली, अनारसे, करंज्या, शेव,चिवडा, लाडू, हे पदार्थ महिलावर्ग घरीच बनवायचे.तळणाचा वास असायचा. परंतु आता बदलत्या परिस्थितीत अनेक ठिकाणी हे पदार्थ तयार करून त्याच्या दिवाळीआधी ऑर्डर स्वीकारल्या जातात. काही ठिकाणी हे पदार्थ बनवून देणारे कारागीर अपार्टमेंटमध्ये जाऊन महिलावर्गाला फराळाचे पदार्थ मजुरी घेऊन बनवून देतात. त्यामुळे दिवाळी आधीच आठ दिवस अशा कारागिरांकडे महिलांची रांग लागलेली असते. तर दुसरीकडे बाजारपेठ फराळाच्या दुकानांची खूप मोठ्या प्रमाणात स्टॉल्स उघडलेली असतात, आणि माफक दरात त्याची विक्री होत असते. असे काही बदल काळानुसार होऊन आता घरी दिवाळीचे पदार्थ बनवायची प्रथा पद्धत कमी झाली आहे. अगदी तुरळक प्रमाणात काही महिला ते घरी बनवतात.
दिवाळी चा काळ तसा सहाच दिवसाचा.गोवत्स/वसू बारस,धनत्रयोदशी, नर्कचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, पाडवा, आणि भाऊबीज.
आश्विन कृष्ण द्वादशीस, म्हणजेच गोवत्सद्वादशीस, वसुबारस पुजा केली जाते. वसुबारस ह्याचा अर्थ-वसु म्हणजे द्रव्य (धन) त्यासाठी असलेली बारस म्हणजे द्वादशी. या दिवसाला गोवत्स द्वादशी असेही म्हणतात. भारताची संस्कृती कृषिप्रधान असल्याने या दिवसाचे महत्त्व विशेष आहे. या दिवशी संध्याकाळी गाईची वासरा सह पूजा करतात. घरांत लक्ष्मीचे आगमन व्हावे या हेतूनेही या दिवशी सवत्स धेनूची पूजा करण्याची पद्धत आहे. ज्यांच्याकडे घरी गुरे, वासरे आहेत त्यांच्याकडे ह्या दिवशी पुरणाचा स्वयंपाक करतात.ज्या कडे गायवासरु नाहीत ते फोटो ठेवून पुजा करतात. बाजरीची भाकरी व गवाऱ्याच्या शेंगाची भाजी या दिवशी करतात
आश्विन कृष्ण त्रयोदशीस धनत्रयोदशी साजरी केली जाते. या दिवशी यमदीपदानही या दिवशी सायंकाळी घराबाहेर चमेलीच्या तेलाचा दिवा लावून त्याच्या वातीचे टोक दक्षिण दिशेस करतात. त्यानंतर त्या दिव्यास नमस्कार करतात.व दक्षिण दिशेला तोंड करुन मंत्र म्हणतात.....
।। मृत्युना पाशदंडाभ्यां कालेन श्यामया सह ।।
।। त्रयोदश्या दीपदानात सुर्यजः प्रियतां माम ।।
याने अपमृत्यू टळतो असा समज आहे.
धनत्रयोदशीबद्दल अजून एक दंतकथा आहे. ती म्हणजे जेव्हा असुरांबरोबर इंद्रदेव यांनी महर्षि दुर्वास यांच्या शाप निवारणाकरिता समुद्र मंथन केले, तेव्हा त्यातून देवी लक्ष्मी प्रगट झाली.तसेच समुद्र मंथनातून धन्वंतरी अमृतकुंभ बाहेर घेऊन आला. म्हणून धन्वंतरीचीही या दिवशी पूजा केली जाते. धन्वंतरी हा वैद्यराज असून त्याच्या हातातील कमंडलू अमृताने भरलेला असतो असे म्हटले आहे.
आयुर्वेदाच्या दृष्टीने हा दिवस धन्वंतरी जयंतीचा आहे. वैद्य मंडळी या दिवशी धन्वंतरीची (ज्याला देवांचा वैद्य म्हणतात) त्याची पूजा करतात. लोकांस प्रसाद म्हणून कडुनिंबाच्या पानांचे बारीक केलेले तुकडे व साखर असे लोकांना देतात. या दिवशी वस्त्रालंकार खरेदी करणे शुभ मानतात. उपवास करून घरातले द्रव्य व अलंकार पेटीतून काढून ते साफसूफ करतात. कुबेर,विष्णू -लक्ष्मी, योगिनी, गणेश, नाग आणि द्रव्यनिधी यांची पूजा करून पायसाचा,धणे,खडीसाखर, लाह्या,अनारसे चा नैवेद्य दाखवितात. हा दिवस भारतात राष्ट्रीय आयुर्वेद दिवस म्हणूनही साजरा होतो.
धनत्रयोदशी नंतर येते-नरक चतुर्दशी. या सणाशी संबंधित नरकासुर वधाची आख्यायिका प्रचलित आहे.आपण ही कथा त्यादिवशी सकाळी, रेडिओ,टि.व्ही.वर ऐकतो.



या दिवशी कृष्णाने नरकासुराचा वध करून प्रजेला त्याच्या जुलुमी राजवटीतून सोडवले. नरकासुराने तप करून ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतले व अवध्यत्वाचा - म्हणजेच कुणाकडूनही वध होणार नाही - असा वर मागून घेतला. त्या वराच्या योगाने त्याने अनेक राजांना हरवून त्यांच्या कन्या व त्या राज्यांतील स्त्रियांचे अपहरण केले. नरकासुराने अश्या एकूण १६,१०० स्त्रियांना पळवून नेले. व मणिपर्वतावर एक नगर वसवून त्यात त्यांना बंदी बनवून ठेवले. कृष्णाने नरकासुराच्या देहाचे दोन तुकडे करत त्याचा वध केला. नरकासुरवधाने देवादिकांना, तसेच प्रजेला आनंद झाला. नरकासुराच्या बंदिवासातील कुमारिकांना त्यांचे स्वजन स्वीकारणार नाहीत, हे जाणून कृष्णाने या १६,१०० कन्यांसोबत विवाह केला व त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली. कृष्णाच्या पराक्रमाचे स्मरण म्हणून आश्विन कृष्ण चतुर्दशीस नरक चतुर्दशी हा सण साजरा केला जातो. नरकचतुर्दशीच्या दिवशी अलक्ष्मीचे पहाटे मर्दन करून आपल्यातील नरकरूपी पाप वासनांचा नायनाट व अहंकाराचे उच्चाटन करायचे आहे. तेव्हाच आत्म्यावरील अहंचा पडदा दूर होऊन आत्मज्योत प्रकाशित होईल असा यामागील संकेत आहे. या दिवशी अभ्यंगस्नानाचे महत्त्व असते. सकाळी लवकर उठून, संपूर्ण शरीरास तेलाचे मर्दन करून, सुवासिक उटणे लावून, सूर्योदयापूर्वी केलेले स्नान म्हणजे अभ्यंगस्नान करतात.औक्षवण करतात. फटाके फोडतात.
आश्विन अमावास्येस लक्ष्मीपूजन केले जाते. या दिवशी प्रदोषकाळी (संध्याकाळी) लक्ष्मीचे पूजन केले जाते.लक्ष्मी ही फार चंचल असते असा समज आहे.त्यामुळे, शक्यतोवर हिंदू शास्त्राप्रमाणे लक्ष्मीपूजन हे, लक्ष्मी स्थिर रहावी म्हणून, स्थिर लग्नावर करतात. त्याने लक्ष्मी स्थिर राहते असा समज आहे. अनेक घरांत श्रीसूक्तपठणही केले जाते. व्यापारी लोकांचे हिशोबाचे नवीन वर्ष (विक्रमसंवत्) लक्ष्मीपूजनानंतर सुरू होते. या दिवशी सर्व अभ्यंग स्नान करतात. पाटावर रांगोळी काढून तांदूळ ठेवतात. त्यावर वाटी किंवा तबक ठेवतात. त्यात सोन्याचे दागिने, चांदीचा रुपया, दागिने ठेवून त्यांची पूजा करतात. महाराष्ट्रात लक्ष्मी पूजनाला अनारसे, बत्तासे, साळीच्या लाह्यांचा नेवैद्य दाखवण्याची पद्धत आहे. हा दिवस व्यापारी लोक फार उत्साहात साजरा करतात.आपापल्या दुकानात, व्यवसायाचे ठिकाणी, वहीपूजन, करतात. या दिवशी महिला स्वच्छता करण्यासाठी लागणारी नवी केरसुणी विकत घेतात. तिलाच लक्ष्मी मानून तिच्यावर पाणी घालून हळद-कुंकू वाहून घरात वापरण्यास सुरुवात करतात.केरसुणीने घर स्वच्छ होवून घरातील अलक्ष्मी म्हणजेच दारिद्र्य दूर होते असे मानले जाते.
प्राचीन काळी या रात्री कुबेरपूजन करण्याची रीत होती. कुबेर हा देवांचा खजिनदार आणि धनसंपत्तीचा स्वामी मानला जातो.
अलक्ष्मी म्हणून ज्या देवतेला मध्यरात्री हाकलून देण्याची प्रथा आहे, तीच खरी या सणाची इष्ट देवता असल्याचेही म्हटले जाते. तिला सटवी, निर्ऋती या नावांनीही ओळखतात. निर्ऋती ही सिंधू-संस्कृतीतील मातृदेवता समजली जाते. तिला आपण अलक्ष्मी म्हणून तिरस्कारले असले तरी ती राक्षसांची लक्ष्मी आहे असे देव मानत असल्याचे उल्लेख दुर्गासप्तशतीमध्ये आहेत.
लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने 'आर्थिक व्यवहारातील सचोटी व नीती ' आणि 'अर्थप्राप्तीच्या साधनांविषयी कृतज्ञता' अशी दोन महत्त्वाची मूल्ये मनात रुजतात, ही या पूजेची विशेषता आहे.
कार्तिक शुद्ध प्रतिपदेस बलिप्रतिपदा हा सण साजरा केला जातो. हा दिवस दिवाळी पाडवा म्हणून ही ओळखतात, या दिवशी बळी राजाचे रांगोळीने चित्र काढतात व त्याची पूजा करतात आणि 'इडा पीडा टळो व बळीचे राज्य येवो' असे म्हणतात. साडेतीन मुहूर्तातील एक मुहूर्त म्हणून या दिवसाला विशेष महत्त्व आहे. बळीराजा करण्याची प्रथाही अस्तित्वात आहे. असा हा लोककल्याणकारी राजा बळी, त्याच्या पूजनाचा दिवस. या दिवशी विक्रम संवत सुरू होतो. आर्थिक हिशोबाच्या दृष्टीने व्यापारी लोक दिवाळीतील पाडवा ही नववर्षाची सुरुवात मानतात. लक्ष्मीप्राप्तीसाठी नव्या वह्यांचे पूजन करून व्यापारी लोक वर्षाचा प्रारंभ करतात. व्यापारी लोकांच्या जमा-खर्चाच्या कीर्द-खतावणीच्या नवीन वह्या ह्या दिवशी सुरू होतोत. नवीन वह्या सुरू करण्यापूर्वी वह्यांना हळद-कुंकू, गंध, फूल, अक्षता वाहून पूजा करतात. व्यापारी या दिवशी मुहूर्ताने व्यवहार सुद्धा करतात. घरोघरी सायंकाळी पाटाभोवती रांगोळी काढून पत्नी पतीला औक्षण करते व पती पत्नीला ओवाळणी घालतो.मुली वडिलांना औक्षवण करतात. नवविवाहित दांपत्याची पहिली दिवाळी पत्नीच्या माहेरी साजरी करतात. ह्यालाच "दिवाळसण" म्हणतात. त्यानिमित्त यादिवशी जावयास आहेर करतात.
कार्तिक शुद्ध द्वितीयेस भाऊबीज हा सण साजरा केला जातो. या दिवशी यम आपली बहीण यमी हिच्या घरी जेवायला गेला म्हणून या दिवसाला "यमद्वितीया" असे नाव मिळाले असे मानले जाते. बंधु-भगिनींचा प्रेमसंवर्धनाचा हा दिवस आहे. या दिवशी बहिणीच्या घरी भाऊ गोडधोड भोजन करतो आणि सायंकाळी चंद्राची कोर दिसल्यानंतर बहीण प्रथम चंद्रकोरीस व नंतर भावाला औक्षवण करते. भाऊ मग ओवाळणीच्या ताटात 'ओवाळणी' व भेटवस्तू देऊन बहिणीचा सत्कार करतो.
दिवाळीचा हा पाच- सहा दिवसांचा काळ म्हणजे एक आनंद पर्वणी असते. अशाप्रकारे हे उत्सव -सण हे एकूणच मनाला आनंद देऊनच वर्षभर यातून ऊर्जा उत्साह मिळत असतो. यामागे जसे सांस्कृतिक, धार्मिक अध्यात्मिक, महत्व आहे तसेच या सर्व उत्सव- सणामागे वैज्ञानिक महत्व सुद्धा आहे. म्हणून आपण या दिवसांची आतुरतेने वाट पाहत असतो. आणि बघा, आपण वर्षभरात हे सर्व पदार्थ खात असतो, परंतू ऐन दिवाळीच्या दिवसात बनवलेल्या चकल्या, शेव, चिवडा, अनारसे,शंकरपाळे, यांची चव काही वेगळीच असते म्हणूनच- नरकचतुर्दशी,लक्ष्मीपूजनाचे दिवशी अभ्यंगस्नाना नंतर चकली बरोबर चहा, सोबतीला हातात दिवाळी अंक म्हणजेच साहित्यिक फराळही, गुलाबी थंडी, ही मजा काही औरच असते, ती दिवाळीतच अनुभवायला मिळते... ऐन दिवाळीत दिवाळी पहाट..पाडवा पहाट...सारखे कार्यक्रमाचे आयोजन होते. आताही अनेक मोठ्या शहरांमध्ये होणार, त्याच्या जाहिराती वृत्तपत्रातून आपण वाचतो.
मात्र आता येणारी दिवाळी थोडी वेगळी आहे असं म्हणायला हरकत नाही.... लोकांच्या मनात उत्साह आहे बंधने ही कमी झालेले आहे, तरीपण सुरक्षिततेच्या आणि आरोग्याच्या दृष्टीने काही गोष्टी लक्षात ठेवणे हे महत्त्वाचे आहे ती म्हणजे प्रदूषण आणि फटाक्यापासून होणारे अपघात.फटाक्या शिवाय दिवाळी नाही हे समीकरण आहे. परंतु आता त्यात थोडा बदल करावा लागणार आहे, तो म्हणजे फटाके फोडणेत थोडी कपात करणे. कारण त्यात ध्वनि प्रदूषण- वायू प्रदूषण ही तर महत्वाची कारणे आहेतच. परंतु नेहमी त्यातून होणारे धोके व इजा त्यामुळेच याबाबतीत खबरदारी घेतली तर आपली दिवाळीही,आरोग्यदायी, आनंदायी होऊ शकणार आहे.आता पणत्यांची आरास,झेंडूची फुलांची आरास करावी.
अजून गोष्ट आहे ती महागाईमुळे झालेली कोंडी. बाजारपेठ जरी फुलली असली तरी एकाएकी खरेदीची सर्वसामान्यांची हिम्मत नाही. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती भडकल्या आहेत. तेल, तूप डाळी, मिठाई ,फटाके कपडेलत्ते आणि एकुणच सर्व वस्तू त्यात आल्यात. पेट्रोल डिझेल यांचे भाव दर कुठल्या कुठे गेलेत. आता प्रवासही महागला आहे. मोटरसायकल, कार, ह्या आता चैनीच्या वस्तू राहिलेली नाही. आवश्यक बाबी आहेत. एकूणच जनतेच्या मनात एक गोष्ट मात्र खदखदते आहे ती म्हणजे चांगले दिवस कधी येणार? दिवाळी कशी साजरी करायची मध्यमवर्गीयांनी. सामान्यांनी ? रेशन कार्डधारकांना आता शंभर रुपयात दिवाळीचा साहित्य देण्याचा प्रयत्न केला आहे. राजकारणीयांची तर नेहमीच दिवाळी आहे .असते.पण मध्यमवर्गीयांची सर्वसामान्यांची दिवाळी साजरी करण्याची संकल्पना आणि तो दिवाळीचा आनंद मिळणे , त्याकडे बघणे आवश्यक आहे. राजकीय परिस्थिती बघितली तर सर्व अस्वस्थता आहे.अतिशय वाईट शब्दांत एकमेकांवर आरोप प्रत्यारोप सुरु आहेत. राजकारणात खालची पातळीवर आले आहे. महत्त्वाच्या प्रश्नांकडे लक्ष द्यायला कोणालाही वेळ नाही मोठे मोठे निर्णय घेतले जात आहे परंतु त्याची अंमलबजावणी व्हायला पाहिजे ती होत नाही शासन आणि प्रशासन यातही ताळमेळ नाही असे दिसते.
अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे, पण नुकसानभरपाईची रक्कम कधी मिळेल निदान दिवाळीआधी मिळाल्यास त्यांची दिवाळी आनंदात जाईल.महागाई तर कमी होणे शक्य नाही.... दिवाळी कोणाची असो श्रीमंताची असो वा गरिबांची असो ती सगळ्यांना आनंद देणारी असते थोडक्यात दिवाळी आमच्या घरी आणि तुमच्या घरी सारखाच आनंद देणारी असते.
ही दिवाळी सर्वांना ।आरोग्यदायी।आनंददायी। जावो.

# पत्रलेखन कला टिकवून ठेवायला हवी

आधुनिक केसरी

**आज माहीती तंत्रज्ञानाच्या युगात सर्वत्र मोबाईल, संगणकामुळे माणसाच्या जिवनात क्रांती झाली. ईमेल, फेसबुक, ट्विटर, व्हाट्सअप, इन्स्टाग्राम , युट्यूब व अन्य सोशल नेटवर्किंग साधनांमुळे माणसांशी एकत्र जोडणे, संवाद साधणे सोपे झाले आहे. परंतू आजच्या बदलत्या जमान्यात पत्रलेखन कला लोप पावते की काय असा प्रश्न पडला आहे.**



ऐक काळ असाही होता .तेव्हा कोणतेही साधने नव्हती तेव्हा पत्र पाठवण्याशिवाय पर्यायच नव्हता.तेव्हा टपालावर, आंतरदेशीय पोस्टकार्ड,हाताने कागदावरच पत्र लिहायला लागायची. आणि नातेवाईक,मित्रांना पाठवायला लागायची. आणि आपण त्या पत्राच्या उत्तराची आतुरतेने वाट पहायची खरं म्हणजे अनमोल पत्र वाचताना चेहर्यावर विरळाच आनंद दिसायचा ,एखाद्या मित्राचे पत्र आले की मन हेलावून जायचे पत्रातुन आपुलकी जाणवयाची एक प्रकारे जिव्हाळा त्यात होता.एखाद्याचे पत्र आले तर खुशाली कळायची.एक प्रकारे पत्रव्यवहार म्हणजे माणसाचं अतुट विश्वासाचं नातं झालं होतं. आज तुरळक प्रमाणात हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या पत्र व्यवहार होत आहे.कौटुबिक , पत्रव्यवहार नाहीसा झाला आहे.शासकीय कार्यालयालयीन पत्रव्यवहार आजही टिकवुन आहे हे जमेची बाजु आहे.
मी सुद्धा एक पत्रलेखक आहे मला पत्रमैत्रीचा छंद आहे .अनेक महाराष्ट्रातील वाचकांनी मला शेकडो पत्र पाठवले आहेत .मी ती आठवणींचा ठेवा म्हणून जपून ठेवले आहे.
वेळात वेळ काढून पत्र व्यवहार करण्याचा प्रयत्न चालुच आहे.

संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. 7721045845

खरं म्हणजे पत्रलेखन कला टिकवून ठेवायला हवी.अर्थात त्या काळात मोबाईल नव्हते .परंतु संगणक,टेलिफोन होते त्यामुळे तार,आणि फॅक्स करावा लागायचा.त्यावेळी पैसे द्यावे लागायचे. कुणाला पत्र पाठवयाला पाठवायचे असेल तर विकत आणून लिहायला लागायचे .यात खरा आनंद होता. त्या काळात पत्रव्यवहाराला खुप महत्व होते .कधी पोस्टमन पत्र घेऊन येईल याचीच आपण आतुरतेने वाट पाहत असायचो. पत्र आल्यावर मनावर एक प्रकारचे समाधान दिसायचे.मात्र आज तो आनंद हरवला आहे.
पत्र हे सुखाने ,सवडीने,निवांतपणे व मनापासून लिहता येते.पत्रलेखनातुन वेगळाच आनंद मिळायचा आज इंटरनेटमुळे जग जवळ आले पण माणसं दुरावली.आज व्हाट्सअप,फेसबुक,ईमेल मुळे एका क्षणात माणुस जोडत आहे.परंतू पत्रलेखन कला ही टिकवून ठेवण्याची आवश्यकता आहे. आज काळ बदलला असला तरी आपली संस्कृती टिकवायला हवी.पत्रलेखन कला टिकवायलाच हवी.

# सौर कृषीपंप योजना फायद्याची



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**कृषिपंप ग्राहकांना वीजपुरवठ्यासाठी विद्युत रोहित्रे उभारली जातात. लघुदाब वाहिनीची लांबी वाढल्याने कमी दाबाने वीजपुरवठा होणे, वारंवार बिघाड होऊन वीजपुरवठा खंडित होणे, तांत्रिक वीजहानी वाढणे, रोहित्रामध्ये बिघाड होण्याच्या प्रमाणात वाढ, वीज अपघात, वीजचोरी यांसारख्या समस्यांमुळे अखंडित व शाश्वत वीजपुरवठा करण्याचे उद्दिष्ट साध्य होण्यास अडचणी निर्माण होतात. याला पर्याय म्हणून मुख्यमंत्री सौर कृषिपंप योजना दुसऱ्यांदा सुरू होण्याला महत्त्व आहे.**

आपला देश कृषी प्रधान आहे आणि देशातील सर्वात जास्त लोकसंख्या ही खेड्यात राहते. कोरोना काळात आपल्या देशाला कृषी क्षेत्रानं तारलं. पण एवढं असूनही आपल्या देशात शेतकरी किंवा ग्रामीण क्षेत्राकडे मोठं दुर्लक्ष केलं जातं. गावात चोवीस तास वीज नाही. पाण्याचे स्रोत नाहीत. शेतकऱ्याच्या मालाला भाव नाही. त्यामुळे शेती बिनभरवशाची झाली आहे. शेतीला वीज ,पाणी आणि मालाला भाव या गोष्टी झाल्या की आपला हा शेतकरी जगात कुणालाच ऐकणार नाही. त्यामुळे या तीन गोष्टी पुरवण्याकडे राजकारण्यांनी लक्ष द्यायला हवे. वीज कधीच पूर्ण वेळ शेतकऱ्याला उपलब्ध झाली नाही. आठ तासांपैकी कमी वीज ग्रामीण भागाला मिळते. लाखो शेतकरी वीज कनेक्शनपासून वंचित आहेत. सध्याची विजेची उपलब्धता लक्षात घेतली तर लक्षात येते की, सर्वच शेतकऱ्यांना शेतीसाठी वीज मिळणार नाही. पण सौरपंपची सोय व्हायला काहीच हरकत नाही. शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करणे सोयीचे व्हावे व पारंपरिक पद्धतीने कृषिपंपासाठी लागणाऱ्या खर्चात बचत व्हावी या उद्देशाने सौर कृषी पंप योजना महत्त्वाची आहे.



कृषिपंप ग्राहकांना वीजपुरवठ्यासाठी विद्युत रोहित्रे उभारली जातात. लघुदाब वाहिनीची लांबी वाढल्याने कमी दाबाने वीजपुरवठा होणे, वारंवार बिघाड होऊन वीजपुरवठा खंडित होणे, तांत्रिक वीजहानी वाढणे, रोहित्रामध्ये बिघाड होण्याच्या प्रमाणात वाढ, वीज अपघात, वीजचोरी यांसारख्या समस्यांमुळे अखंडित व शाश्वत वीजपुरवठा करण्याचे उद्दिष्ट साध्य होण्यास अडचणी निर्माण होतात. याला पर्याय म्हणून मुख्यमंत्री सौर कृषिपंप योजना दुसऱ्यांदा सुरू होण्याला महत्त्व आहे. मुख्यमंत्री सौर कृषिपंप योजना राज्यात पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे शेतकरी समाधानी दिसत आहेत. मागे ही योजना चालू होती,पण मध्यंतरी ती बंद झाली. राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारने यंदा दोन लाख सौरपंप देण्याचे जाहीर केले आहे. यापूर्वी ही योजना 'मेंढा' कडून राबवली जात होती. कदाचित यंदाची योजना महावितरण कंपनीकडून राबवली जाण्याचे संकेत आहेत. 'महावितरण'च्या कनेक्शनपासून दूर किंवा गैरसोय असलेल्यांसाठी सौरपंप योजना फायद्याची आहे. शिवाय पाच वर्षे देखभाल-दुरुस्ती संबंधित कंपनीकडे असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठी जागरुकता झाली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत नुकत्याच झालेल्या एका बैठकीत राज्यातील सर्व कृषी फीडर सौरऊर्जेवर आणण्याचा प्रयत्न आहे, अशी चर्चा झाली आहे. यासाठी शासकीय जमीन नसल्यास भाडपट्ट्याने मिळवता येईल. त्याद्वारे जमीनधारक शेतकऱ्यांनाही उत्पन्न मिळेल, असा विचार झाला आहे. त्याचप्रमाणे, शेतीला बारा तास वीज देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या योजनेद्वारे दोन वर्षांत चार हजार मेगावॅट वीजनिर्मितीचे उद्दिष्ट आहे. राज्यात यंदा दोन लाख सौरपंप वितरित करण्याचे नियोजन आहे. यापूर्वीच्या नियम अटींनुसार सर्वसाधारण लाभार्थींच्या गटाकरिता तीन अश्वशक्ती पंपासाठी 25 हजार 500 आणि पाच अश्वशक्ती पंपासाठी 38 हजार 500 रुपये एवढी रक्कम भरायची होती. अनुसूचित जाती-जमातीकरिता तीन अश्वशक्ती पंपासाठी 12 हजार 750 रुपये; तर पाच अश्वशक्ती पंपासाठी 19 हजार 250 रुपये एवढी रक्कम भरावी लागते. नवीन योजनेत याच सवलती पुढे सुरू राहतील की नव्याने सूचना येणार, याबाबत अजून काही तपशील बाहेर आलेला नाही. मात्र यात शेतकऱ्यांचं हित जोपासलं जावं अशी अपेक्षा.

# काळानुसार शिक्षकांना 'सजग' होणं आवश्यक

आधुनिक केसरी

**(रविवारच्या अंकावरून पुढे)**

त्यामुळे आजच्या शिक्षणपद्धतीत अनेक अनिष्ट प्रवृत्तींनी शिरकाव केला आहे. विद्यार्थी हा ग्राहक आहे ही संकल्पना रूढ होऊ लागली आहे. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये मात्र शिक्षणक्षेत्राची अवस्था ही त्रिशंकूप्रमाणे अधांतरी लोंबकळत असताना दिसते. खाजगी शिक्षण संस्था कोणतेच निश्चित तत्त्व बाळगताना दिसत नाहीत. शिक्षणातून पैसा मिळविणे आणि त्याचा वापर विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सुविधा पुरविण्याकडे न करता, त्याचप्रमाणे गुणवत्तेकडे दुर्लक्ष करून शिक्षणसंस्थेची वाढ करण्यासाठी अथवा राजकीय किंवा तत्सम उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केला जात आहे. शासन शिक्षणाबद्दलची आपली जबाबदारी झटकू पाहत आहे. सरकारी आणि महापालिकेच्या शाळांकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्यामुळे खाजगी शिक्षणसंस्थांतून शिक्षण घेणे सर्वसामान्य माणसाला परवडणारे नाही, त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. महाविद्यालयीन पातळीवर कला आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थी महाविद्यालयात क्वचितच हजर राहताना आढळतात तर विज्ञान शाखेतून दिले जाणारे विज्ञानशिक्षण हे दिवसेंदिवस निकृष्ट दर्जाचे होत आहे. प्रयोगशाळांकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, अव्यासंगी शिक्षक आणि विद्यार्थ्यांना भरमसाठ गुण देऊन वरच्या वर्गात ढकलण्याची वृत्ती. त्यामुळे पदवीपर्यंतचे शिक्षण घेऊनही विद्यार्थी नोकरी मिळवण्यासाठी सक्षम होत नाही.

अभियांत्रिकी महाविद्यालयांची संख्या भरमसाठ वाढली आहे आणि दिवसेंदिवस त्यात भर पडत आहे. अभियांत्रिकी पदवी मिळवल्यानंतर रोजीरोटीचा प्रश्न निश्चित सुटेल, यामुळे विद्यार्थी आणि पालकांचा कल अभियांत्रिकी शाखेकडे दिवसेंदिवस वाढतो आहे. भरमसाठ संख्या असलेल्या महाविद्यालयांची गरज भागविण्यासाठी प्रवेश पात्रता दिवसेंदिवस कमी टक्केवारीवर आणून ती आता 40 टक्यांपर्यंत पोहोचली आहे.

अभियांत्रिकी पदवी मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी 25 टक्केच विद्यार्थी नोकरी मिळवण्यासाठी लायक असतात, ही वस्तुस्थिती आहे. परंतु याकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष केले जाते. एम.बी.ए.सारख्या पदवीसाठी प्रचंड प्रमाणात जागा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. राजकीय सोयीसाठी अनेक संस्थांना त्यांच्याकडे कुठल्याही सुविधा उपलब्ध नसताना परवानगी दिली जाते, त्यामुळे या पदवीचे महत्त्व दिवसेंदिवस कमी होत आहे. या सर्व प्रकारात प्रचंड प्रमाणात नफा मिळवणारे संस्थाचालक शिक्षकांना मात्र कमी पगारावर राबवून त्यांची उपेक्षा करतात. समाज मात्र शिक्षकांकडून उच्च दर्जाच्या गुणवत्तेची अपेक्षा करतो. हा आजचा विरोधाभास आहे. याउलट ज्या शिक्षकांना भरपूर वेतन मिळते आणि ज्यांची सेवा ही संरक्षित आहे असे शिक्षक गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करताना दिसत नाहीत.

शिक्षकांनी कृतिशील असणे आवश्यक आहे. शिक्षकांच्या प्रतिपादनाला कृतीची जोड असेल तर त्याचा विद्यार्थ्यांना अधिक लाभ होतो. त्यासाठी शिक्षकांनी संशोधन करणे आवश्यक आहे. संशोधनामुळे शिक्षकांना अद्ययावत माहिती मिळते. परंतु त्याचबरोबर त्यांचे आकलन आणि त्यांच्या शिकवण्याचा दर्जा आपोआपच उंचावतो. संशोधनामुळे विद्यार्थ्यांच्या मनामध्ये शिक्षक त्या विषयाची आवड निर्माण करू शकतो, शिवाय विषय अधिक चांगल्या प्रकारे शिकविल्यामुळे विद्यार्थ्यांना शिकण्याचा आनंद लुटता येतो.

उच्च शिक्षणाचा विचार करता प्रामुख्याने तीन बाबींचा समावेश करणे जरुरीचे आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्देशित केलेल्या या तीन बाबी म्हणजे उपलब्धता, समानता आणि गुणवत्ता या होत. भारतामध्ये अद्यापही उच्च शिक्षणाची उपलब्धता हव्या तेवढ्या प्रमाणात नाही. उच्च शिक्षणाकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. संपूर्ण देशात ती सरासरी 14 टक्के एवढी आहे असे मानले जाते. ही संख्या 20 टक्यांपर्यंत वाढविण्याची योजना आहे. केवळ उच्च शिक्षणाची उपलब्धता वाढवून चालणार नाही तर जे घटक उच्च शिक्षणापासून वंचित राहिले आहेत. त्यांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात येण्याची संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेले घटक, स्त्रिया आणि अल्पसंख्याक यांना उच्च शिक्षणामध्ये विशेष संधी मिळणे आवश्यक आहे, अर्थात याचे नियोजन राज्यनिहाय होणे आवश्यक आहे. अन्यथा एखाद्या घटकाला दिलेल्या विशेष संधीमुळे इतर घटकांवर अन्याय होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रासारख्या शिक्षणप्रगत असणाऱ्या राज्यात मुलींसाठी 30 टक्के वेगळे आरक्षण ठेवणे आवश्यक आहे का? यांसारख्या बाबींचाही विचार व्हायला हवा. शिक्षणाची उपलब्धता वाढवण्यासाठी नवीन महाविद्यालये आणि विद्यापीठांची गरज भासणार आहे. परंतु ही महाविद्यालये कोणत्या भागात आहेत याचा विचार व्हायला हवा, अन्यथा शहरात महाविद्यालयांची संख्या खूपच प्रमाणात वाढल्याचे दिसून येते. वाणिज्य आणि कला या विद्याशाखांचे शिक्षण हे अधिक व्यवसायाभिमुख होणे तितकेच गरजेचे आहे. विज्ञान विषयामध्ये व्यवसायाभिमुखतेचा समावेश असला तरी विज्ञानशिक्षणाच्या गुणवत्तेविषयी प्रश्न उपस्थित होत आहेत. एकूणच उच्च शिक्षणाची गुणवत्ता हा एक कळीचा मुद्दा आहे. अभियांत्रिकी शाखांकडे विद्यार्थ्यांचा ओढा दिसून येतो. अभियांत्रिकी पदवीमुळे रोजगारांची उपलब्धता सहजपणे होते असा एक सर्वसाधारण समज आहे. परंतु अभियांत्रिकीची पदवी घेतलेले केवळ 25 टक्केच विद्यार्थी रोजगार मिळविण्यासाठी सक्षम असतात ही वस्तुस्थिती आहे. उच्च शिक्षणामध्ये गुणवत्तावाढीसाठी आणि शिक्षणपद्धतीत लवचिकता आणण्यासाठी श्रेयांक पद्धत आपणे जरुरीचे आहे.

दिवसेंदिवस शासन उच्च शिक्षणाची जबाबदारी झटकू पाहत आहे. त्यामुळेच अभिमत आणि खाजगी विद्यापीठांना परवानगी देण्याचा शासनाचा कल दिसून येतो. या विद्यापीठांच्या गुणवत्तेबद्दल साशंकता आहेच, त्याचबरोबर अशा विद्यापीठांधून शिक्षण घेणे हे दिवसेंदिवस सामान्य माणसाला शक्य होणारे नाही. त्यामुळे शिक्षणाची उपलब्धता वाढली तरी समाज मात्र उच्च शिक्षणापासून वंचित राहणार की काय अशी शंका उपस्थित करण्यास भरपूर वाव आहे. एकूणच भारतातील उच्च शिक्षण हे एका संक्रमण अवस्थेतून जात आहे. या संक्रमणाची परिणती समाजासाठी लाभदायक अशा स्थितीमध्ये व्हावी यासाठी समाज आणि शिक्षक यांनी जागरूक राहणे आवश्यक आहे.

शिकवणे म्हणजे माझा विषय शिकवणे ही वृत्ती नव्या जमान्यातील शिक्षकांच्या मनातून हद्दपार व्हायला हवी. शिक्षक हा पाठ्यपुस्तकाचा नसावा. तो एखाद्या विशिष्ट विषयाचाही नसावा. शिक्षक हा विद्यार्थ्याचा असावा! हा मूलभूत विचार नव्या पिढीतील शिक्षकासमोर त्याला समजेल अशा पद्धतीने आणि त्याला रूचेल अशा रीतीने मांडला पाहिजे. शिक्षणाकडे बघण्याचा निकोप दृष्टिकोन एखाद्या शिक्षकाला लाभला म्हणजे मग पुढच्या गोष्टी त्याला सांगाव्या लागणार नाहीत. दुर्दैवाने शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमात वर्गात शिकवण्यासाठी आवश्यक ती तंत्रे शिकवली जातात. परंतु शिक्षणाकडे बघण्याचा शुद्ध दृष्टिकोन प्रदान करण्याची सोय या अभ्यासक्रमात नाही. त्यामुळे प्रशिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या बिचाऱ्या शिक्षकाला शिक्षण म्हणजे काय व शिकवणे म्हणजे काय हे ठावूक नसते. शिक्षणाची मूळ संकल्पनाच स्पष्ट नसलेला शिक्षक मुलांमध्ये कसल्याही प्रकारचे ज्ञान, कौशल्य वा चारित्र्य यांचे बीजारोपण करू शकत नाही. अलीकडच्या काळात शाळाही मार्क्सवादी बनल्यामुळे शिक्षकांना समृद्ध बनवण्यासाठी शाळांकडे वेळ नसतो. एकदा प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकालाही निरंतर प्रशिक्षणाची आवश्यकता असते याचा विचार फार कमी शाळा करतात. त्यामुळे नोकरीला लागताना शिक्षक जसा असतो, तसाच तो बऱ्याचवेळा निवृत्त होतो. त्याच्या कौशल्यात, ज्ञानात कसल्याही प्रकारचा बदल झालेला दिसत नाही. माणसाचे सर्व प्राणीमात्रांत असलेले वेगळेपण म्हणजे त्याची विचारशक्ती व ज्ञान संपादनाची इच्छा! शिक्षण हे केवळ चार भिंतीतच मिळते असं नाही. कारण अनौपचारिक शिक्षणाचे धडे व्यक्ती जन्माला आल्यापासून मिळत असतात. चांगलं, सुदृढ आणि संपन्न व्यक्तिमत्त्व घडवण्याच्या प्रक्रियेत केवळ पुस्तकी शिक्षण पुरेसं नाही, तर जीवनासाठी लागणारी कौशल्यं व व्यवहारोपयोगी ज्ञान मिळवणं अपरिहार्य आहे. आचार-विचारांचं शिक्षण देत सुदृढ आणि संपन्न नागरिक घडवणं, ही महत्त्वाची जबाबदारी अंतिमतः शिक्षकांवरच येते.



विद्यार्थी सक्रिय कसे राहतील, त्यांच्यातील नकारात्मक भावना दूर होऊन सकारात्मक दृष्टिकोनातून ते जीवनाकडे कसे पाहतील, या दृष्टीनं प्रयत्न करणं, ही आजच्या शिक्षकाची मुख्य जबाबदारी ठरते. आपली वर्तवणूक व सहभागातून शिक्षकाला 'ये हृदयीचे ते हृदयी', या भूमिकेतून अध्यापन कार्य करता आलं पाहिजे. त्यासाठी अध्ययन - अध्यापनात नवे, पूरक बदल शिक्षकाला करावे लागतील. नाहीतर 'आडातच नसेल तर पोहऱ्यात येणार कुठून' या म्हणीप्रमाणे शिक्षकाची अवस्था होईल. म्हणून शिक्षकानं सतत स्वतःला अपडेट ठेवलं पाहिजे. आज ई-माध्यमांचा जमाना आहे. या काळात येणाऱ्या नव्या बदलांचा शोध घेत शिक्षकानं 'डिजिटल टीचर' होणं जास्त उपयुक्त ठरेल. नव्या शिक्षणप्रक्रियेमध्ये आंतरविद्याशाखीय अभ्यासाला महत्त्व प्राप्त होतंय. त्यामुळे विद्यार्थी एकाच वेळी भाषा, गणित, सामाजिक शास्त्रं आणि संगीत विषय घेऊन ज्या वेळी शिकू पाहतोय, त्यावेळी शिक्षकांनाही त्याच्याबरोबर अष्टावधानी व अष्टपैलू व्हावं लागेल. आजच्या काळात विद्यार्थ्यांना केवळ माहिती देणे पुरेसं नाही, कारण ती माहिती तर आज एका क्लिकवर त्यांना सहज उपलब्ध आहे. त्यामुळे माहिती संकलनापुढे जाऊन माहितीचं सूक्ष्म वाचन कसं करावं, त्याचं विश्लेषण करून नेमकं काय घ्यावं आणि ते कुठे आणि कसं वापरावं? याबद्दलचा साधक-बाधक विचार विद्यार्थ्यांना देणं, ही आधुनिक शिक्षकाची महत्त्वाची जबाबदारी असणार आहे. या पद्धतीनं जो विद्यार्थ्यांचं आयुष्य घडवेल, तोच आजचा सक्षम शिक्षक ठरणार आहे. त्यामुळे काळाबरोबर नवी आव्हानं पेलत शिक्षकांनाही आता 'सजग' होणं गरजेचं आहे. आजच्या माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात 'शिक्षक डिलीट' होणार नाही, याची काळजी त्याने स्वतः घ्यायला हवी. कितीही साधनं उपलब्ध असली तरी जे ध्येय साध्य करायचं आहे, त्यासाठी शिक्षकच केंद्र ठरणार आहे. त्यामुळे आपली गरज व स्वतंत्र जागा आधुनिक शिक्षणव्यवस्थेत निर्माण करणं, हे शिक्षकापुढील आव्हान आहे, असं वाटतं.

आजचा काळ हा डिजिटल तंत्रज्ञानाचा काळ आहे. शिक्षणक्षेत्रात नव्यानं होणारे बदल लक्षात घेऊन शिक्षकांना अध्यापन कार्याबरोबरच डिजिटल स्वरूपाचं शैक्षणिक लेखन करावं लागेल. ई कन्टेंटचा वापर करून आपलं वर्गाध्यापन अधिक आनंददायी बनवता येईल. ज्ञान-माहितीचं संक्रमण नव्या पिढीत करताना सूक्ष्म वाचनातून त्याचं वर्गीकरण, विश्लेषण झालं तर ज्ञानाचं सामाजिकीकरण होईल. समोर असणारा प्रत्येक विद्यार्थी हा विचार, बुद्धी, ज्ञान व क्षमता याबाबतीत वेगळा असणार आहे, याची जाणीव ठेवून अध्यापन कार्यात 'विद्यार्थी फोकस' करता आला पाहिजे. शिक्षकाला विद्यार्थ्यांबरोबर समाज व समाजपरिस्थितीही वाचता येणं आवश्यक आहे. कारण समाजाचं 'चरित्र' घडवण्याचं काम शिक्षकच करत असतात. आजूबाजूला कितीही आव्हानात्मक परिस्थिती असली तरी 'सारेच दीप कसे मंदावले आता' असं न म्हणता नवे प्रकाश किरण दाखवण्याचं महत्त्वपूर्ण कार्यही शिक्षकालाच करावं लागेल, हे निश्चित. विद्यार्थी घडवताना खरं तर शिक्षक स्वतःलाही घडवत असतो. त्या दृष्टीनं आजन्म विद्यार्थी असणं ही खऱ्या शिक्षकाची ओळख असते. काळाबरोबर होणारे बदल टिपत त्यानं भविष्यात येऊ घातलेल्या अनेक गोष्टींशी स्वतःला जुळवून घ्यायला हवं. तरच शिक्षक म्हणून तो अधिक सक्षमपणे उत्तम काम करू शकेल. ज्ञान प्रक्रिया ही अखंड चालणारी महत्त्वाची प्रक्रिया आहे. त्यात एकदा संपादन केलेलं ज्ञान हे अंतिम किंवा परिपूर्ण असू शकत नाही. ज्ञान म्हणजे केवळ माहिती संकलन नव्हे. विचारांना सक्षम पद्धतीनं आत्मसात करून त्याचा विनियोग सकारात्मक दृष्टिकोनातून करणं म्हणजे ज्ञान होय. माहितीचं ओझं कमी करून अधिक 'आनंददायी व सहज शिक्षण' विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी शिक्षकांवर येते. काळाबरोबर येणारी नवी आव्हाने पेलताना त्यांच्याकडे केवळ समस्या म्हणून न पाहता संधी म्हणून पाहिल्यास त्याचा अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत छान उपयोग करून घेता येईल. 'झटकून टाक जीवा दुबळेपणा मनाचा' ही भूमिका इथं दिशादर्शक ठरेल. मरगळ झटकून कायम नावीन्यपूर्णतेचा ध्यास असणं अधिक महत्त्वाचं. ध्यास, आत्मविश्वास, कयास आणि अभ्यास ही चतुःसूत्री शिक्षक म्हणून आत्मसात करायला हवी.

## मन चक्षु...

सजिवापेक्षा भली
असे पांढरी काठी
बने लाडका सखा
रे अंध व्यक्तीसाठी

जणूं कुटुंब सदस्य
सदैव राहते पाठी
स्वावलंबन जागृत
मिळते दिव्य दृष्टी

एखादअवयव नसे
कशास व्हावे कष्टी
भविष्य लिही नवे
काळीभोर रे पाटी

काही कमी जास्ती
असे हरेक ललाटी
कोण कसा योध्दा
ते पाहतो जगजेठी

जागी करे डोळसा
घणाण वाजून घंटी
दोष देती नशिबास
काही अशी करंटी

कुणी नाही सर्वक्षम
अहंकारवृत्ती खोटी
पहावे अंधारापुढचे
उघडा मनाची ताटी

– हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

## तू आणि मी

तू अनओळखी, मी ही अनोळखी
तरी दोघांत एक जवळकीच.
तू बघायची, मी बघायचो
तरी दोघे नजर चुकवायचो.
तू हसायची, मी हसायचो
जेव्हा आपण गर्दीत फसायचो
तू पुन्हा हसायची, मी बघायचो
मग दोघेही टिव्हीशन मधून घरी निघायचो
तू घरी जायची, मी ही यायचो
तरी दोघेही एकमेकांचा विचार करायचो
तू उत्तर द्यायचे, मी हसायचे
तू बघायचे, मी गप्प बसायचे.
तू भेटायचे, मी बोलायचे
दोघांनीही गैर समज दूर करायचे
वर्ष संपायचे, तू जायचे
मी फक्त बघायचे.

तुझी आठवण यायची मी फोन करायचा
त्यातही तो दुसऱ्याने उचलायचा
पुन्हा करायचा तो पुन्हा
दुसऱ्यानेच उचलायचा.
मी समजायचे तुला नाही बोलायचे
मग म्हणायचं आता किती नाणी घालवायचे
मी हसायचं, मनात म्हणायचं
आता पुन्हा नाही फसायचं
अशा प्रकारे कधीही न सुरू झालेल्या
तुझ्या माझ्या प्रेमाचा शेवट करायचो.

–अमोल मोकासे
कन्नड जि. औरंगाबाद

## सुदर्शन चक्र

बोट माझे धरुनिया हाती
नियंत्या तू मज चालविशी
चालताना वाटेत मजसी
सुख दुःखाचे रूप दाविशी...

सागरातल्या लाटां बघुनि
जीव माझा बघ घाबरतो
जाणीव होता तव हाताची
स्वतःला मग मी सावरतो...

अथांग सिंधू पसरलेला
सापडले का मज किनारा?
भयाण वादळ, काळोखात
मिळेल का मज कुठे थारा?..

हजार असले प्रश्न किती
अन् गूढ छाया भिवविती
अक्राळ विक्राळ दानवांच्या
भेदक गर्जना कानी येती...

जाणीव होता तुझ्या कराची
चिंता क्षणात गायब होती
साक्षात्कार बघ होतो आणि
सुदर्शन येते मज हाती...!

–महादेव बी. बुरुटे,
शेगाव, ता. जत, जि. सांगली
मो. 9765374805

## अधोगती

अरे माणसा माणसा
करू नकोस वाईट कर्म
देह नश्वर आहे
जानून घे जीवनाचे मर्म

दुसऱ्याच्या वैभवाचा
करू नकोस हेवा
कष्ट करूनी, घाम गाळूनी
मिळव मेहनतीचा मेवा

गरजवंतांना दे सदा
मदतीचा हात
संकटाच्या वेळी मिळेल
त्याची तुला साथ

नको सोडू बंधुभाव
नको सोडू ममता
सर्वावर प्रेम करुनी
हृदयी बाळग समता

अरे माणसा माणसा
जप आपुलकीची नाती
अनितीच्या मागे धावूनी
करू नकोस अधोगती

–रविंद्र व्ही. चालीकवार
महागाव, जि. यवतमाळ
मो.9011559106

## सारंचं तर पेटलं आहे

सारंच तर पेटलं आहे
आग कुठं दिसत नाही
फाटलेल्या आभाळाला
सुईदोरा गवसत नाही.

करपल्या शिवारात
भेगाळले रान सारे
डोईवर दुष्काळाचे
घोंगावती भग्न वारे.

कृष्णाविना पराजय
अर्जुनाचा ठरलेला
कालियुगी कौरवांचा
जोर जरा वाढलेला.

वाशिल्याच्या कुत्र्यांनी
रस्ता सारा अडवला
धर्मराज युधिष्ठिर
जुगारात सडवला.

युगे झाली कितीतरी
जाळूनीया रावणास
रावणचं सज्ज पुन्हा,
रावणाच्या दहनास.

ज्ञानेश्वर गायके..कन्नड
मो..९४०३३८४८८९

# भावकवितांचे इंद्रधनुष्य : ‘हळवी आठव’




आपल्या सर्वांच्या आठवणी” घडून गेलेल्या दिवसांच्या, घटनांच्या,व्यक्ती- स्मृतींच्या असतात .या आठवणीना भावविश्वात खूप महत्वाचे स्थान असते. आठवणीत गुंतलेले मन “हळवे” असते हे ही वेगळे सांगायला नकोच.

दोनच महिन्यांपूर्वी म्हणजे -०८ जुलै २०२२ ला प्रकाशित झालेला “हळवी आठव” कविता -संग्रह - कवयित्री -सायली देशपांडे यांचा “पहिला काव्यसंग्रह” आहे. याबद्दल कवयित्री-सायली देशपांडे यांचे मी आपल्या सर्वांच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन करतो.

इंटरनेट माध्यमावर एक साहित्यिका आणि कविता लेखनाची उत्तम जाण असलेली कवयित्री म्हणून “सायली देशपांडे परिचित आहेत. वाचकांनी त्यांच्या कवितेला नेहमीच दाद दिली आहे.अशी भरभरून दाद देण्याची संधी मला सायली देशपांडे यांच्या हळवी वाट” या संग्रहातील कवितांनी दिली. “खूप छान कविता असलेला या कवयित्रीचा हा पहिला संग्रह रसिकांची पसंती मिळवणारा ठरणार” असे आवर्जून सांगावेसे वाटते.

जेष्ठ पत्रकार आणि ललित लेखक मल्हार अरणकल्ले यांची ललितरम्य प्रस्तावना “हळवी आठवला” लाभली आहे.

प्रास्तविक - शीर्षक - “शब्दार्थापलीकडील प्रसन्न कविता” या एक वाक्यातच सायली देशपांडेच्या कवितातील विशेष गुण आपल्याला समजून येतो आणि “या संग्रहाच कुठलही पान उघडून वाचू लागताच ही जाणीव होते. प्रतिभा आणि शब्दकळा यांचं ईश्वरदत्त देणं लाभलेल्या सायलीताईंनी आणखी खूप लिहावं अशा शुभेच्छा या प्रस्तावनेत आहेत.

कवयित्री सायली देशपांडे यांना लेखन -प्रवासात जेष्ठ साहित्यिका सौ.साधना डोंगरे यांचा साहित्य सहवास लाभलेला आहे. या शब्द-मैत्रीतून ‘हळवी आठव’ संग्रहातील कविताबद्दलचे अभिप्रायपर मत त्यांनी शुभेच्छातून व्यक्त केले आहे.

कवयित्री सायली देशपांडे यांचे मनोगत यथोचित आणि समर्पक झाले आहे. ७१ पृष्ठांच्या या संग्रहात -एकूण ५८ कविता आहेत. आरंभी म्हटल्याप्रमाणे भावविश्वाशी जवळीक साधणाऱ्या या भावकविता “आहेत”, दैनंदिन दिनक्रम असो, आयुष्यातील वळणावर, टप्प्यावर सामोरे जाताना आलेले अनुभव असो, हे कवितेतून सांगतांना भावनांना प्राधान्य देणारी” ही कवयित्री आहे” असे मला जाणवले.

“आपण काय लेखन करतो आहोत “ याचे अचूक भान सायली देशपांडे यांच्या व्यक्तिमत्त्वातील साहित्यिकास आहे”. या कवयित्रीच्या कविता ..नेमक्या शब्दातून व्यक्त होतांना ..मनापर्यंत पोहोंचणारी प्रभावी कविता हे “हळवी आठव” या पहिल्याच कविता संग्रहाचे प्रभावित करणारे वैशिष्ट्य ठरेल असे मला वाटते.

**कवीसाठी शब्दांच्या वाटेवरचा प्रवास कस असतो त्याबद्दलची कविता –**

“भावनेच्या गाभाऱ्यातून
शब्दांना ओल मिळते
शब्दांच्या वाटेवरती
मायेची लाट फिरते ...
(शब्दांच्या वाटेवरती ..प्र, ८),

२. मधुर सहजीवनाचे गुपित समजावून सांगणारी कविता ..
तुझे माझे जुळतांना
धागे गुंफू रेशमाचे
होईल सुरेल गाणे
आपल्या सहजीवनाचे ......( तुझे माझे जुळतांना..पृ..२६ ),

३. ती “च्या असण्याने काय होत असते ..बघा या कवितेत ..
ती घराचा होता भाग
आभाळमाया दाटते
लक्ष्मी सवे अन्नपूर्णा
सुख अंगणी साठते .... (ती... पृ..३८ ),

४. आयुष्य म्हणजे उन..पावसाचा खेळ ..त्याची सुरेख कविता..
श्रावणातल्या खेळासम
सजले आयुष्य ही
कधी ऊन कधी बरसला पाउस ही
... (बरसला पाउस ही ..पृ..४६ ),

५. एक वेगळी कविता ..मी निश्चिंत “यात स्त्रीच्या भावना “पुरुष “व्यक्तिमत्वाबद्दलच्या .. पिता आणि पती , आजोबा आणि सोबती ..”एक छान काव्य चित्र वाटले.
पिता आणि पती ही दोन नाती
महत्वाची
पिता सांभाळतो पूर्वार्ध ..उत्तरार्ध
पतीसवे सुखकर अगदी ... ( मी निश्चिंत ..(पृ..५१ ).

याशिवाय राधाकृष्ण ( पृ.१२ ), पदर “(पृ.२० ), “तू आणि मी “(प्र.३० ), मिठी : (पृ.२९ ) , तो बाप असतो “ (पृ.४१ ), “वसंतातले मोहरणे ( पृ. ५९ ) , “सांज केशरी “ (६४), सात्विक रूप “ (पृ.७० ) या कविता देखील मनाला भावतील अशाच आहेत. संग्रहातील कविता चार ओळीचे कडवे असलेली परिचित कविता नसून ..कमी-जास्त ओळींची रचनाकृती दिसते.

प्रकाशक व साहित्यिक प्रा .गणेश भगत यांचे ब्लर्ब ..संग्रहातील कवितांच्याबद्दल यथायोग्य सांगणारे आहे. निलेश औटी यांनी संग्रहासाठी केलेले मुखपृष्ठ सुरेख आणि अर्थवाही झाले आहे.

रसिकांनी जरूर वाचावा असा हा कविता संग्रह आहे. कवयित्री सायली सुहास देशपांडे यांच्या लेखन -प्रवासास अनेक शुभेच्छा.

**कविता संग्रह : हळवी आठव, लेखिका : सायली देशपांडे, अहमदनगर, पृ.७२, संपर्क -९४२०९५३९२४, प्रकाशक : गणराज प्रकाशन, अहमदनगर, संपर्क ९०४९४०९८८६.**

# भूकमारीची समस्या



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**जगातील भूकमारीचा अहवाल दरवर्षी घोषित केला जातो. हा अहवाल नुकताच घोषित झाला आहे. जगातील भूकमारीचा अहवाल जागतिक भूक निर्देशांक २०२२ या नावाने नुकताच जाहीर झाला आहे. हा अहवाल भारताची चिंता वाढवणारा आहे कारण या अहवालात देशाची भूकमारीची समस्या चिंताजनक असल्याचे म्हटले आहे.**

हा अहवाल भारतासारख्या कृषिप्रधान आणि प्रगत समजल्या जाणाऱ्या देशाला खाली मान घालायला लावणारा आहे. या अहवालानुसार जागतिक भूक निर्देशांकांमध्ये भारताची घसरण झाली असून शेजारचे पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, श्रीलंका हे देश भारताच्या पुढे आहेत. भूक निर्देशांकानुसार गेल्या वर्षी भारत १०१ व्या स्थानी होता पण नुकत्याच जाहीर झालेल्या अहवालात भारताची घसरण होऊन भारत १०७ व्या स्थानी पोहचला आहे. विशेष म्हणजे त्याच्या आधीच्या वर्षी भारत ९४ व्या स्थानी होता याचाच अर्थ दरवर्षी भारताची भूकमारीची समस्या वाढत चालली आहे. पाकिस्तान ९९, बांगलादेश ८४, नेपाळ ८१, श्रीलंका ६४ या शेजारी देशांची स्थिती भारतापेक्षा चांगली असल्याचे हा अहवाल सांगत असल्याने भारताची नामुष्की झाली आहे. या अहवालानुसार या ही देशात भूकमारीची समस्या आहे मात्र ती भारतापेक्षा कमी आहे. या देशांनी भारताच्या तुलनेत आपल्या नागरिकांपर्यंत अन्न पोहचवण्यात चांगली कामगीरी केली आहे असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. एव्हढेच नाही तर बालकांच्या उंचीवर आधारीत कमी वजनाचा दर अर्थात अल्पपोषण दर (चाईल्ड वेस्टिंग दर) भारतात सर्वाधिक १९.३ असल्याची गंभीर बाबही या अहवालातून समोर आली आहे. याचाच अर्थ देशातील कुपोषित बालकांचे प्रमाण वाढत चालले आहे. देशातील १४ टक्के जनता अपुरी पोषित आहे असेही या अहवालात म्हटले आहे. देशातील ६० टक्के जनता दररोज अर्धपोटी किंवा उपाशी झोपते असाही एक अहवाल मध्यंतरी आला होता. आता आलेला हा अहवाल सरकारी यंत्रणेचे धिंधवडे काढणारा आहे. सरकार गरिबी हटवण्याचा आणि कुपोषण कमी कमी करण्याच्या गमजा मारते त्यासाठी अब्जावधी रुपये खर्च करते मात्र प्रत्यक्षात चित्र किती विदारक आहे याचाच प्रत्यय हा अहवाल देतो. १४ वर्षाखालील मुलांचे कुपोषण ही सर्वात गंभीर बाब आहे कारण हेच मुले देशाचे भविष्य आहे. हेच मुले अशक्त असेल तर देश सशक्त कसा होईल? एकीकडे देशातील कोट्याधीशांची संख्या दरवर्षी वाढते तर दुसरीकडे देशातील भूकमारीची समस्या वाढते हा विरोधाभास भारतासारख्या देशाला परवडणारा नाही. केंद्र सरकार सेंट्रल व्हिस्टा सारख्या प्रकल्पावर पाण्यासारखा पैसा खर्च करत आहे तर दुसरीकडे देशातील ६० टक्के नागरिकांना दोन वेळेचे पुरेसे अन्न मिळत नाही हे चित्र देशासाठी हितावह नाही. हे चित्र बदलण्यासाठी सरकारने युद्ध पातळीवर प्रयत्न करायला हवेत मात्र तसे न करता सरकार हा अहवालाच नाकारीत आहे. प्रत्यक्ष स्थिती न पाहताच हा अहवाल तयार केल्याचे सरकार म्हणत आहे अर्थात हा अहवाल नाकारून अथवा भूक निर्देशांक अहवाल तयार करणाऱ्या संस्थेवर टीका केल्याने देशातील कुपोषणाचे वास्तव बदलणार नाही ते बदलायचे असल्यास सरकारला सत्य स्वीकारून देशातील भूकमारीची आणि कुपोषणाची समस्या सोडवण्यासाठी ठोस प्रयत्न करावे लागतील.



# आर्थिक समावेशाद्वारे सक्षमीकरण मोहिमेचा शुभारंभ

## राज्य सरकारच्या विविध योजनेचा थेट लाभ : केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील औराळा येथे आर्थिक समावेशाद्वारे सक्षमीकरण मोहीमेचा शुभारंभ केन्द्रियअर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्या हस्ते संपन्न झाले. या उपक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील तळागाळातील जनतेला बँकेशी जोडण्याबरोबरच केंद्र सरकारच्या आणि राज्य सरकारच्या विविध योजनेचा थेट लाभ मिळावा यासाठी आर्थिक सामावेशद्वारे सक्षमीकरणाचा प्रयोग देशभरात राबविला जात आहे. नागरिकांनी बँक आपल्या दारी उपक्रमाचा लाभ घ्यावा आणि या अभियानात नवीन अकाउंट ओपन प्रधानमंत्री जीवन ज्योती बीमा योजना अटल पेन्शन योजना अशा सरकारी विविध योजना लाभ घेवा तसेच विषयी नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी फॉर्म भरून नोंदणी साठी नागरीकांनी सुरुवात करावी व आर्थिकरित्या सक्षम बनवण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ देण्यात येणार आहे, असे आवाहन केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉक्टर भागवत कराड यांनी शनिवारी औराळा येथे नागरिकांना केले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाजपा तालुका संघटक सुभाष काळे व आभार प्रदर्शन आकाश पगारे यांनी केले. याप्रसंगी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संजय खंबावते, भाजपा जिल्हा सचिव डॉक्टर संजय गव्हाणे, भाजपा तालुका अध्यक्ष भगवान कोल्हे, भाजपा तालुका संघटक सुभाष काळे, जिल्हा परिषद सदस्य सुरेश अण्णा गुजराणे ,जिल्हा परिषद सदस्य किशोर आबा पवार, पंचायत समिती सदस्य तथा माजी उपसभापती सुनील निकम,भाजप सोशल मीडिया काकासाहेब तायडे, भाजपा युवा मोर्चा तालुका अध्यक्ष प्रदीप बोडखे, भाजपा युवा नेते गणेश घुगे, भाजपा विभाग प्रमुख बाळू निकम, भाजप तालुका चिटणीस विलास पवार, विलास भोजने, सुदाम पवार, प्रभाकर बागुल, सरपंच सोनाली सुरेश बागुल, उपसरपंच आकाश पगारे, प्रभाकर निकम, विठ्ठल गुजराणे, रत्नाकर गुजराणे, संतोष खंडेलवाल, गणेश गुजराणे, संतोष गुजराणे, संजय वाघचौरे, सुरेश पवार आदी भाजप पदाधिकारी ग्रामस्थ व बँक मॅनेजर व कर्मचारी उपस्थित होते.





# उसाला चांगला भाव द्या; अन्यथा ऊस तोडू देणार नाही

## कन्नड बारामती ॲग्रोला राजू शेट्टींचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने ऊस परिषदचे आयोजन करण्यात आले होते. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एफआरपी प्रमाणे ऊसाला रास्त भाव मिळावा, वाहतूक खर्च कमी व्हावा, कन्नड तालुक्यातील ऊसतोडणी प्रथम व्हावी, वेळेवर ऊस तोडणी व्हावी आदी विषयाच्या अनुषंगाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळावा, या उद्देशाने कन्नड येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने राजुरेश्वर मंगल कार्यालय कन्नड ऊस परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या ऊस परिषदेसाठी खा. राजू शेट्टी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतांनी म्हणाले की जर उसाला मनासारखी भाव मिळाला नाही तर कन्नड तालुक्यातील उस तोडु देणार नाही असा सज्जड दम कन्नडच्या बारामतीला ॲग्रोला दिल्यांनी सर्व शेतकऱ्यांनी टाळाचा गजर केला. यावेळी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच शेतकरी उपस्थीत होते.

# फळगळतीचे कारण ओळखून उपाययोजना करा : डॉ. पाटील



आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** पाण्याचा ताण, संजीवकांचे असंतुलन, पोषक घटकांची कमतरता यासारख्या कारणांमुळे, किंवा रोग- कीटकांच्या प्रादुर्भावामुळे लिंबूवर्गीय फळाची फळगळ होते. त्याचे नेमके कारण ओळखून उपाययोजना करावी, असे मत औरंगाबाद येथील फळ संशोधन केंद्र हिमायतबागचे प्रभारी अधिकारी डॉ. एम. बी. पाटील यांनी व्यक्त केले. कृषी विभाग पैठण आणि कृषी जगत संचालक रामेश्वर सुसे याच्या सयुक्त विद्यमाने मोसंबी फळपिक पाहणी आणि तांत्रिक चर्चासत्र आयोजित करण्यात आलेल्या शेतकरी सुसंवाद बैठकीत ते बोलत होते. डॉ. पाटील म्हणाले, की मुख्यत्वे, फळ धारणेनंतर होणारी बहुतांश फळगळ वनस्पती शास्त्रीय कारणामुळे होते. सध्या वातावरणात बदल झाला आहे. त्यामुळे खतांचा डोस शिवाया आंबे बहरातील मोसंबीची तोडणी हे देखील महत्वाचे आहे. सध्या शेतकरी फळांना अधिकचा दर मिळावा म्हणून मोसंबी परिपक्व होऊनदेखील झाडालाच ठेवतात. त्यामुळे शेतकऱ्यांचा नफा नाही तर अधिकचा तोटाच होणार असल्याचा सल्ला मोसंबी संशोधक डॉ. पाटील यांनी दिला आहे. त्यामुळे मोसंबीची वेळेत तोडणी केली तरच पुढचे फळ शेतकऱ्यांच्या पदरी पडणार आहे. मोसंबीला अधिकचा दर नसल्याने तोडणीकडे दुर्लक्ष करतात. मात्र, मोसंबी फळे झाडावर अधिकचा काळ ठेवली तर त्याचे विपरीत परिणाम त्या झाडावर आणि पुढील बहरावर होणार असल्याचे डॉ. पाटील यांनी स्पष्ट केले आहे. यावेळी डॉ. हरिहर कौसडीकर,तालुका कषी अधिकारी संदिप शिरसाट, कृषीभूषण आप्पासाहेब पाटील,ज्ञानेश औटे, तालुका व्यापारी महासंचाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर उगले,कोषाध्यक्ष नामदेव शिरसाट, उमेश तट्टु, जितू पांडे, मनोज पहाडे, अशोक चितलांगी, मुरकुटे सर, उध्दव वावरे, दिनेश पेंढारकर, कृष्णा भराट यांच्यासह मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांची मोठी उपस्थिती होती.



# प्रश्न उसाचा जागर एफआरपीचा, स्वाभिमानी संघटनेचा कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील औराळा येथे शनिवारी १५ऑक्टोंबर रोजी ग्रामपंचायत कार्यालय समोर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी शेतीवर बोलू काही या अंतर्गत प्रश्न उसाचा जागर एफ आर पीचा या संदर्भात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते तथा कृषी भूषण भाऊसाहेब थोरात यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना ऊस तोडण्यापासून भावापर्यंत येणाऱ्या सर्व प्रकारच्या समस्या मांडत कन्नड येथे १७ऑक्टोबर रोजी शेतकरी संघटनेचे नेते माजी खासदार राजू शेट्टी यांच्या उपस्थितीत होणाऱ्या ऊस परिषदेस उपस्थित राहण्याचे आवाहन केले. याप्रसंगी शेतकरी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष कृष्णा साबळे तालुकाध्यक्ष प्रकाश बोरसे माजी सरपंच चंद्रकांत देशमुख शरद मोहिते सचिन गायके रामेश्वर जाधव राजू हारदे संतोष हारदे दिलीप वाघचौरे नितीन जिवरख विनायक वाघचौरे आदी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार
- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# सरपंचांनी अधिकाराचा वापर करत गावाचा विकास साधावा

## आ. किशोर आप्पा पाटील यांचे प्रतिपादन




आधुनिक केसरी न्यूज

**पाचोरा :** सरपंचांनी आपल्या अधिकारांचा योग्य वापर करून लोकाभिमुख कार्य केल्यास ग्रामीण भागाचा कायापालट करणे शक्य असून यासाठी सरपंच बांधव भगिनींनी योग्य तो अभ्यास करून आदर्श ग्राम निर्मितीसाठी प्रयत्न करावेत शिवाय महिला सरपंचांनी क्रियाशील होणे गरजेचे आहे. अनेक ठिकाणी महिला सरपंचाचे पतीच गावचा कारभार करतात, हे चुकीचे असून, महिला सरपंचांनी देखील स्वतः चे अधिकार समजून घेत गावगाडा हाकावाअसे आवाहन आ. किशोर पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात केले. सरपंचांच्या विविध मागण्या व समस्यांवर चर्चा करण्यासाठी तसेच नवीन कार्यकारिणीची निवड करण्यासाठी पाचोरा येथे राज्यातील ग्रामसंवाद सरपंच असोसिएशनची पदाधिकारी बैठक रविवारी पाचोरा येथील आशीर्वाद हॉलमध्ये संपन्न झाली. बैठकीला आ. किशोर पाटील यांच्यासह ग्रामसंवाद सरपंच असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष अजीनाथ धामणे, उपाध्यक्ष प्रमोद भगत, सचिव विशाल लांडगे, अजितसिंग राजपूत, महिला प्रदेशाध्यक्ष कल्याणी राजस, जिल्हा भाजप महिला आघाडी अध्यक्ष रेखा पाटील ग्राम संवाद सरपंच असोसिएशनचे तालुकाध्यक्ष डॉ. नीळकंठ पाटील,सरपंचांच्या समस्यांबाबत मुख्यमंत्र्यांसोबत बैठक तालुकाध्यक्ष, सरपंच राहुल पाटील, अतुल पाटील, ज्योतीबाई पाटील, सीमा शिवदास पाटील, अजय महाजन, प्रदीप सोनवणे, नरेंद्र पाटील, समाधान पाटील, भगवान मोरे यांच्यासह महाराष्ट्रातील चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ, नागपूर, भंडारा, बुलडाणा, औरंगाबाद, जळगाव आदी ठिकाणचे सरपंच या बैठकीला उपस्थित होते. आ. किशोर पाटील यांनी सांगितले की, खेड्याकडे चला गावाकडे चला, असे म्हणण्यासारखे काम सरपंचांनी गावासाठी करून दाखवावे. सरपंचांनी स्वतःचा अधिकार समजून घेतल्यास गावचा विकास होऊ शकतो. यासाठी आदर्श गावाचे अण्णा हजारे, पोपटराव पवार, भास्कर पेरे यांचे अनुकरण सरपंचांनी करायला हवे. सरपंचांच्या समस्या व अडचणी याबाबत निवेदन थेट मुख्यमंत्री शिंदे व ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे लवकरच सादर करून सरपंच व मुख्यमंत्री यांच्यात बैठक घेतली जाईल, असे आश्वासन किशोर पाटील यांनी दिले. सूत्रसंचालन सुनील वंजारी, आभार निलेश पुलंगकर यांनी मानले.



# डॉ. कराड यांनी सांगितले हात धुण्याचे महत्त्व

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** जागतिक हात धुवा दिनानिमित्त ग्रामपंचायत औराळा तालुका कन्नड येथे केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी हात धुण्याची प्रात्यक्षिक दाखवून ग्रामस्थांना हात धुण्याचे महत्त्व पटवून सांगितले. ग्रामपंचायत औराळा येथे आर्थिक समावेशन कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पला केंद्रीय राज्यमंत्री डॉ भागवत कराड यांनी भेट दिली. आवश्यक त्या सूचना दिल्या माननीय डॉ भागवत कराड यांनी प्रत्यक्ष हात धुण्याचे प्रात्यक्षिक ग्रामस्थ समोर केले व ग्रामस्थांना नियमित हात धुण्याचे महत्त्व पटवून सांगितले नियमित हात धुतल्याने आजारी पडण्याचे प्रमाण कमी होईल यासाठी ग्रामस्थ व महिला व विद्यार्थ्यांनी नियमित हात धुण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे माजी सदस्य पंचायत समिती माजी उपसभापती सदस्य ग्रामपंचायतचे सदस्य सरपंच. उपसरपंच तहसीलदार संजय वारकड, गट विकास अधिकारी सी एम ढोकणे, संदीप चव्हाण, नागेश किरतकर उपस्थित होते.



# तालुका युवक आघाडी अध्यक्षपदी गोरटकर

आधुनिक केसरी न्यूज

**नायगाव :** लोकस्वराज्य आंदोलन युवक जोडो अभियानांतर्गत लोकस्वराज्य आंदोलन संस्थापक अध्यक्ष प्रा. रामचंद्र भरांडे सर, अर्जुन गायकवाड, लोकस्वराज्य आंदोलन मराठवाडा कोषाध्यक्ष युवक आघाडीचे जिल्हाध्यक्ष अंकुशदादा गायकवाड यांच्या उपस्थितीत नायगाव तालुका युवक आघाडी अध्यक्षपदी हनंमत गोरटकर, श्याम गोरटकर, मारोती गोरटकर यांची नियुक्ती करण्यात आली यावेळी संतोष गडंबे, गोपाळ वाघमारे, अर्जुन गायकवाड, अंकुश गायकवाड, ज्ञानेश्वर गोरटकर, गणपत कांबळे, साहेबराव गोरटकर व अनेक लढवय्ये आंदोलक उपस्थित होते.

# नदी संवाद यात्रा, शिवनानदी जलपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त नदी संवाद यात्रा चला जाणूया नदीला उपक्रमअंतर्गत शिवनानदी संवाद यात्रा नदीचे उगमस्थान असलेल्या कन्नड तालुक्यातील कळंकी येथे दिनांक १५ऑक्टोबर रोजी शिवना नदी पात्रावर कलश पुजन कन्यापूजन, वृक्ष लागवड करून शुभारंभ करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राज्यातील प्रमुख 75 नद्यांचे पुनरुज्जीवन करण्याचे नियोजन शासनस्तरावर ठरलेले आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील प्रमुख नदी असलेल्या शिवनानदी चा या प्रकल्पात समावेश करण्यात आलेला आहे. चला जाणुया नदीला या. उपक्रमात नदीचा भौगोलिक, राजकीय, आर्थिक आणि जैवविविधता याबाबत अभ्यास करून देशातील नद्यांना पुन्हा पूर्वीचे वैभव प्राप्त करून देणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. नदीची उगम ते संगम अशी परिक्रमा करून सविस्तर अहवाल तयार करण्यात येत आहे. या उपक्रमाचा औपचारिक शुभारंभ संजीवनी थोरात, आरुषी थोरात, भाग्यश्री पडवळ या कन्यांचे पूजन करुण त्यांच्या हस्ते कळंकी येथे करण्यात आला. तसेच हनुमान मंदीरात वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी सरपंच केदारनाथ थोरात, उपसरपंच हरिष थोरात, अरुण थोरात, जनार्धन थोरात, प्रभाकर थोरात, उपक्रम समीतीचे बाळासाहेब जिवरक, गोकुळ सुरासे, विपीन साळे, सतिश वाघ, अर्जुन घोडके, राजु शेळके, ओमकार कोळसे, राहुल वाघचौरे, आदी उपस्थित होते.





# एकुंडी शाळेत वाचन प्रेरणा, हात धुवा दिवस साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**जत :** तालुक्यातील एकुंडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेत वाचन प्रेरणा आणि हात धुवा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांकडून बालकथा, बालकविता, प्रेरक माहिती वाचून घेण्यात आली. मुलांनी वृत्तपत्रांच्या पुरवणी आणि मासिकात आलेली शब्दकोडी मोठ्या आनंदाने आणि उत्फुर्तपणे सोडवली. जिल्हा परिषदेच्यावतीने प्राथमिक शाळांमध्ये 'आनंददायी शिक्षण' उपक्रम राबविण्यात येत आहे. यानिमित्ताने प्रकाशित करण्यात आलेल्या पुस्तकांमधील गोष्टींचे यावेळी वाचन करण्यात आले. यावेळी केंद्रप्रमुख रतन जगताप उपस्थित होते. यावेळी त्यांनी वाचनाचे आणि हात धुण्याचे महत्व विशद केले. ते म्हणाले,'वाचन केल्याने माणूस घडतो. अफाट वाचन केलेल्या डॉ. अब्दुल कलाम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इतिहास निर्माण केला. वाचन केल्याने माणूस ज्ञान समृद्ध होतो. तो पुढे आयुष्यात कुठेच मागे राहत नाही. त्यामुळे मुलांनी वाचन अविरत चालू ठेवले पाहिजे.' शाळेतील पदवीधर शिक्षक आणि पाठ्यपुस्तक लेखक मच्छिंद्र ऐनापुरे यांनी माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या बालपणातील किस्से सांगितले. यावेळी मुख्याध्यापक शिवाजी सावंत, सचिन शेळके, निलेश वानखेडे, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.



# रोटरी क्लबतर्फे सायकलचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज



**अंबाजोगाई :** समाजातील उपेक्षित घटकांना न्याय देण्यासाठी रोटरीने सातत्याने असाच पुढाकार घेऊन काम करावे असे आवाहन रोटरीचे माजी प्रांतपाल ओमप्रकाश मोतीपवळे यांनी केले. येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या वतीने १२ होतकरू विद्यार्थीनींना मोफत सायकलचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून रोटरीचे प्रांतपाल ओमप्रकाश मोतीपवळे, वक्फ बोर्डाचे सदस्य समीर काझी, रोटरीचे अध्यक्ष मोईन शेख, सचिव भिमाशंकर शिंदे, प्रकल्प संचालक डॉ. निशिकांत पाचेगावकर, सहसंचालक अजित देशमुख, अँड.अमित गिरवलकर उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना मोतीपवळे म्हणाले की, अंबाजोगाई व परिसरातील गरीब कुटुंबातील विद्यार्थीनींना शाळा व महाविद्यालयात जाण्यासाठी रोटरी क्लबने सायकल उपलब्ध करून दिल्या. सावित्रीबाई फुले यांचा वारसा जोपासताना मुलींना शिक्षण घेताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी रोटरीने पुढाकार घेतला. असाच नेहमीच घ्यावा असे आवाहनही याप्रसंगी त्यांनी केले. अध्यक्षीय समारोप अध्यक्ष मोईन शेख यांनी केला. यावेळी समीर काझी यांनी दोन मुलींना त्यांच्या वतीने सायकल दिल्या. तर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते या सायकलींचे वाटप विद्यार्थीनींना करण्यात आले. रोटरीच्या सन-२०२३ सालासाठी अध्यक्ष म्हणून स्वप्नील परदेशी तर सचिव गणेश राऊत यांनी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. निशिकांत पाचेगावकर यांनी केले. संचलन प्रा.संतोष मोहिते यांनी तर उपस्थितांचे आभार अजित देशमुख यांनी मानले. यावेळी डॉ.सुरेश अरसुडे, अरुण असरडोहकर, जगदीश जाजू, अंगद कराड, ओमकेश दहिफळे, प्रा.रमेश सोनवलकर, गोरख मुंडे, प्रवीण चोकडा, स्वप्नील परदेशी, कल्याण काळे, डॉ.बालासाहेब लोमटे, रुपेश रामावत, विशाल आखाते, शेख शकील, गोपाळ पारीख, राधेश्याम लोहिया, राम सारडा, यांच्यासह रोटरीचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# अधिष्ठाता डॉ. भास्कर खैरे पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. भास्कर खैरे यांना महाराष्ट्र ऑपथॉमॅलॉजिकल कॉन्फरन्समध्ये आदर्श वैद्यकीय शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

डॉ. भास्कर खैरे यांनी वैद्यकीय क्षेत्रात नेत्रशल्य चिकित्सा विभागात पदव्युत्तर शिक्षण पुर्ण केल्यानंतर वैद्यकीय शिक्षक आणि उत्कृष्ठ नेत्रशेल्य चिकित्सक म्हणून आपली प्रतिमा निर्माण केली. नेत्र विभागातील अनेक अवघड आणि किचकट शस्त्रक्रिया त्यांनी अतिशय सहजतेने यशस्वी करुन दाखवल्या. कोवीडची साथ येवून गेल्यानंतर मोठ्या प्रमाणावर उद्‌भवलेल्या म्युकरमायकोसीसच्या असंख्य रुग्णांवर ही त्यांनी यशस्वी शस्त्रक्रिया करुन अनेक रुग्णांची दृष्टी वाचवली. एक उत्कृष्ट वैद्यकीय शिक्षक, उत्कृष्ट नेत्र सर्जन आणि एक उत्तम प्रशासक म्हणून डॉ. भास्कर खैरे यांनी आपली ओळख निर्माण केली. नेत्र शैल्यचिकित्सक म्हणून त्यांनी केलेल्या कामाची दखल घेवून नुकत्याच नाशिक येथे झालेल्या ४३ व्या महाराष्ट्र ऑपथॉमॅलॉजिकल कॉन्फरन्स मध्ये डॉ. भास्कर यांचा संघटनेचे अध्यक्ष डॉ. भिडे यांच्या हस्ते उत्कृष्ट वैद्यकीय शिक्षक पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर संघटनेच्या सचीव डॉ. रागिणी पारेख, डॉ. जिग्नेश तासाला, पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, डॉ. विलास वांगिकर उत्कृष्ट वैद्यकीय शिक्षक पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. सदरील पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. भास्कर खैरे यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.



# नुजिवीडु सीडचे पीक पाहणी कार्यक्रम व चर्चासत्र



आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर** : आज दिनांक 15/10/2022 मच्छिंद्र संपतराव नेटके लासुरगावकर यांच्या शेतावर नुजिवीडू सीडचे नवनीत वानावर पीक पाहणी व चर्चासत्र आयोजित केले होते, शेतकऱ्यांना प्रत्यक्षात शेतावर नेऊन,पीक पाहणी केली व उत्पादन कसे वाढविता येईल या बाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी डीजीएम सुग्रीव पवार साहेब, योगेश्वर अहेर, अनिस पटेल, तसेच मोठ्या प्रमाणात कृषी विक्रेते व शेतकरी उपस्थित होते.

# डॉ. कलाम यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**सोनपेठ:** येथील कै.रमेश वरपूडकर महाविद्यालयात ग्रंथालय विभागाच्या वतीने मिसाईल मॅन, भारतरत्न डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत सातपुते सर होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध व्याख्याते, कवी, लेखक प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये बोलत होते. डॉ. कलाम हे महान संशोधक आणि देशभक्त होते, तरुणांनी त्यांच्या आदर्शावर पाऊल ठेऊन चालताना व्यसन, कट्टरता यापासून दूर राहून स्वतःचा सर्वांगीण विकास करून घ्यावा असे प्रतिपादन केले. यावेळी प्राचार्य डॉ. सातपुते, प्राचार्या डॉ. शेख शकीला मॅम, डॉ.मुकुंदराज पाटील, संपूर्ण स्टाफ आणि महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.संतोष रनखांब यांनी तर आभार ग्रंथपाल डॉ. अनंत सरकाळे यांनी व्यक्त केले.



# छत्रपती शाहू महाराज आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयात लसीकरणाचा पहिला व दुसरा डोस मोफत

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयात कोर्बेवॅक्स लसीकरणाचा पहिला व दुसरा डोस १२ ते १४ वयोगटासाठी मोफत मिळणार आहे. १२ ते १४ वयोगटातील ज्यांचे वय १२ वर्ष झाले आहे ते १४ वर्ष वयापर्यंत या मुलांसाठी (ज्यांचा जन्म १५ मार्च २००८ ते २०१० दरम्यान झालेला आहे.) फक्त कोर्बेवॅक्स लसीचा डोस देण्यात येणार आहे. कोरोना संसर्ग कमी करण्यासाठी शहरात लसीकरण मोहीम राबविली जात असून १२ ते १४ वयोगटातील जास्तीत जास्त मुलांनी लस घेऊन प्रतिसाद द्यावा. लस घेतल्यानंतर संसर्ग झाला तरी लक्षणे सौम्य असतात, जीवाला धोका निर्मान होत नाही. अशी माहिती छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयाचे प्राचार्य डॉ. श्रीकांत देशमुख यांनी दिली. शासनाच्या मार्गदर्शन सूचनेप्रमाणे HCW/ FLW व ६० वर्षावरील सर्व नागरिकांसाठी डोस आमच्या केंद्रावर निशुल्क उपलब्ध राहील, शासनाच्या नवीन मार्गदर्शक सूचनेप्रमाणे १८ वर्षावरील कोविशील्ड अथवा कोवॅक्सिन लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या नागरिकाना परंतु प्रिकॉशन डोस न घेतलेल्या लाभार्थ्यांला कोर्बेवॅक्स लस प्रिकॉशन डोस म्हणून घेता येणार आहे. तसेच यापूर्वीच्या मार्गदर्शक सूचनासुद्धा ग्राह्यअसतील म्हणजेच ज्या नागरिंकानी पहिला व दुसरा डोस घेतला आहे. त्यांना त्याच प्रकारचा घेता येईल. जसे कि कोव्हीशील्डचा पहिला व दुसरा डोस घेतला असल्यास कोव्हीशील्डचा व कोवॅक्सिन पहिला व दुसरा डोस घेतला असल्यास कोवॅक्सिनचा प्रिकॉशन डोससुद्धा घेता येणार आहे. परंतु दुसरा डोस घेतलेल्या तारखेपासून ०६ महिने किंवा २६ आठवडे ज्यांना पूर्ण झालेले आहेत, असे १८ वर्षावरील सर्वच नागरिक प्रिकॉशन डोस साठी पात्र राहतील. छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयात दि. २५ जानेवारी २०२१ पासून कोविड -१९ लसीकरनास सुरुवात झालेली आहे. तसेच आजपर्यंत एकूण ३०,४०२ लसीकरण करण्यात आले आहे.



# केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्या उपस्थितीत प्रभाकर बागुल भाजपात

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील औराळा येथे आर्थिक समावेशद्वारे सक्षमीकरण हा उपक्रम बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडियच्या माध्यमातून औराळा येथे कार्यक्रमाचे आयोजन केला होता यावेळी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉक्टर भागवत कराड यांच्या उपस्थितीमध्ये औराळा येथील उत्कृष्ट व्यापारी प्रभाकर बागुल यांनी भाजपमध्ये प्रवेश केला डॉक्टर भागवत कराड, भाजपा उपाध्यक्ष संजय खंबायते ,भाजपा जिल्हा सचिव डॉक्टर संजय गव्हाणे ,भाजपा जिल्हा परिषद सदस्य किशोरभाऊ पवार,, सुरेश आण्णा गुजराणे, भाजपा तालुका संघटक सरचिटणीस सुभाष काळे, माजी उपसभापती सुनील निकम यांनी प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचे कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी काकासाहेब तायडे विलास पवार पवन खंडेलवाल आकाश पगारे अमोल वारे विलास भोजने विठ्ठल गुजराणे रत्नाकर गुजराणे गणेश गुजराणे आदी भाजप पदाधिकारी उपस्थित होते. कन्नड तालुक्यातील औराळा येथे आर्थिक समावेशद्वारे सक्षमीकरण हा उपक्रम बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडियच्या माध्यमातून औराळा येथे कार्यक्रमाचे आयोजन केला होता यावेळी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉक्टर भागवत कराड यांच्या उपस्थितीमध्ये औराळा येथील उत्कृष्ट व्यापारी प्रभाकर बागुल यांनी भाजपमध्ये प्रवेश केला डॉक्टर भागवत कराड, भाजपा उपाध्यक्ष संजय खंबायते ,भाजपा जिल्हा सचिव डॉक्टर संजय गव्हाणे ,भाजपा जिल्हा परिषद सदस्य किशोरभाऊ पवार,, सुरेश आण्णा गुजराणे, भाजपा तालुका संघटक सरचिटणीस सुभाष काळे, माजी उपसभापती सुनील निकम यांनी प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचे कौतुक केले.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# अंबाजोगाई शहराला व परिसराला आठ ते दहा दिवसांना पाणी पाजणाऱ्यांना जलपूजनाचा अधिकार कसा ?

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**अंबाजोगाई :** बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील धनेगाव येथील मांजरा धरण परवा सकाळी 100% भरले आहे. मांजरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जास्तीचा पाऊस झाल्याने धरणाची पाणी पातळी वाढली असून धरणाचे दरवाजे उघडून पाणी मांजरा नदीच्या पात्रात सोडण्यात आले आहे. नदीकाठच्या गावांना प्रशासनाने सतर्क राहण्याचा ईशारा दिला आहे. परंतु यातच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून नेहमी प्रमाणे घाई करत काल मांजरा धरणावर जाऊन अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राज किशोर (पापा) मोदी यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी जाऊन जलपूजन केले. हे जलपूजन खरंच मनापासून होते का की, यामागे फक्त राजकारण आहे....? असा प्रश्नही जनता दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विचारत आहे. तर ज्या अंबाजोगाईच्या जनतेला बारा महिने दहा-पंधरा दिवसाला पाणीपुरवठा केला जातो. अलीकडच्या तीन वर्षात तर धनेगाव धरण सातत्याने शंभर टक्के भरून वाहत असतानाही पंधरा दिवसावरील पाणी पुरवठा केवळ आठ ते दहा दिवसावर येऊन ठेपला आहे. मग एकीकडे सातत्याने धनेगाव धरण 100 % टक्के भरलेले असताना आणि अडीअडचणीला काळवटी साठवण तलावावरुन करोडो रुपयांचा चुराडा करून पाणीपुरवठा करण्यात येण्याची सोय असताना, विशेषतः हा तलाव गेल्या आठ-दहा वर्षांपासून सातत्याने भरून ओव्हर फ्लो होत असताना अंबाजोगाई शहर व परिसरातील जनतेला ८ ते १० दिवसांना पाणीपुरवठा करुन विशेषतः माता-माऊलींना त्रास देणाऱ्या नगरपरिषदेला कुणी जाब विचारणार नाही का......?? यांना जलपुजनाचा अधिकार आहे का...? आणि असेलतर कसा....?? असा सवाल अंबाजोगाईची जनता चिडून विचारत आहे.



**नगराध्यक्षा-आमदार-खासदार महिला असताना आम्हां महिलांच्या नशिबी अत्यावश्यक पाण्याचा वनवास का..??**

आंबेजोगाई नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ.रचना मोदी आहेत. जी नगरपालिका गेल्या अनेक वर्षांपासून एकलहाती ज्यांच्या ताब्यात आहे असे माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते असलेल्या राजकीय पापा मोदी यांच्या त्या वहिनीसाहेब असुन हे धनेगाव धरण ज्या केज तालुक्यात येथे त्या केज मतदार संघाच्या विद्यमान आ.सौ. नमिता अक्षय मुंदडा या आहेत, तर हे धरण ज्या जिल्ह्यात येते त्या बीड जिल्ह्याच्या खासदार डॉ.सौ.प्रीतम मुंडे-खाडे या आहेत. मग आम्हाला वाईट याचेच वाटते की नगराध्यक्षा ते आमदार-खासदार या तिन्ही महत्त्वपूर्ण लोकप्रतिनिधी पदांवर महिला असताना आम्हा महिलांच्या नशिबी या अत्यावश्यक पाण्याचा वनवास कायम का व कसा....?? अशा प्रतिक्रिया ही दै.आधुनिक केसरीशी बोलताना अनेक माता-माऊलींनी दिल्या.

**पाणीपुरवठा करण्यात अपयशी ठरलेल्यांना जलपूजनाची घाई का...? आणि खरच त्यांना हा अधिकार आहे का....??--अंबाजोगाईकर**

हतबल जनतेला सातत्याने पाणीपुरवठा करणारे साठवण तलाव व धरण तुडुंब भरलेले असताना पाणीपुरवठा करण्यामध्ये जे राजकिशोर पापा मोदी सातत्याने अपयशी ठरले आहेत. धरण उशाला आणि कोरड घशाला..! या अशा आंबेजोगाईकरांच्या अवस्थेला जे सत्ताधारी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने अपयशी ठरत आले आहेत. तेच दरवर्षी जलपुजनाची घाई करत पहिले जलपूजन आमच्या हातून कसे होईल याची जशी दक्षता घेतात. तशी हे सत्ताधारी सत्तेत येताना ज्या जनतेने यांच्यावरती एवढा मोठा विश्वास टाकत मतरूपी अक्षता यांच्यावरती टाकून यांना वारंवार सत्तेत ठेवते. त्यांच्या भावनेशी हे लोक ईतक्या उघडपणे कसे काय खेळू शकतात हे पण ऐक नवलच आहे..! यांना मनाची आणि जनाचीही नसेलतर मग ही काय आम्हा जनतेचीच मोठी घोडचूक का....? म्हणण्याची वेळ आता अंबाजोगाईकरांवरती आली आहे. तेंव्हा जलपूजन काय करता, आम्हाला पाणी वेळेवर द्या. आमच्या आया-बहिणी-बायका-लेकरांचा त्रास कमी करा अन्यथा आम्हाला फेरबदल करता येतो हे विसरू नका. तुम्ही तुमची राजकीय पोळी भाजण्यासाठी आम्हा नागरिकांना वाऱ्यावर सोडून वाऱ्याच्या वेगाने जाऊन जलपुजनाच्या राजकीय नौटंक्या तुमच्या राजकारणासाठी करत असाल तर राजकारण कोणतेही असो त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार मात्र मायबाप जनतेचा आहे. याचा जर का सत्याधरांना विसर पडत असेल तर मात्र आम्हालाही अशा खालच्या थराच्या नोटंकीबाज राजकारणाला त्याची जागा दाखवण्यात काही वेळ लागणार नाही अशाही खडेचोट प्रतिक्रिया अनेकांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिल्या.



## आंतरभारतीच्या अध्यक्षपदी नाडकर्णी, कार्याध्यक्ष हबीब

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आंतरभारतीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी गोव्याचे पांडुरंग नाडकर्णी व कार्याध्यक्ष पदी आंबाजोगाईचे अमर हबीब यांची निवड करण्यात आली. प्राचार्य सदाविजय आर्य यांच्या निधनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा घेऊन आंतरभारतीच्या विश्वस्त मंडळाने पदाधिकाऱ्यांची निवड केली. राष्टीय उपाध्यक्ष (महिला) संगीता देशमुख (वसमत), सचिव डॉ. डी. एस. कोरे (पुणे) व कोषाध्यक्षपदी प्राचार्य डॉ उमाकांत चनशेट्टी (सोलापूर) यांची निवड करण्यात आली. आंतरभारतीची स्थापना साने गुरुजी यांनी केली. ही संस्था राष्ट्रीय एकात्मतेसाठी कार्य करते.

## गांजाची लागवड : दोघांना अटक, 16 लाखांचा गांजा जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** शेतामध्ये तुर व कपाशीच्या पिकामध्ये गांजा लागवड केल्याच्या गुप्त माहितीवरून बिटरगाव पोलीस स्टेशनच्या पथकाने धाड टाकून २६६ किलो वजनाची गांजाची झाडे जप्त केली. जप्त केलेल्,या गांजाची किंमत १६ लाख २० हजार आहे. बिटरगाव पोलीस स्टेशन हद्दीतील निंगनूर परिसरातील संतोष वाडी येथे ही कारवाई केली असून, दोघांना अटक केली. निंगनुर परिसरातील संतोष वाडी येथील शेतात गांजाची लागवड केलेली असल्याची माहिती उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाडवी यांना मिळाली होती. जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ दिलीप पाटील भुजबळ ,अप्पर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाडवी यांच्या मार्गदर्शनात बिटरगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रताप भोस यांनी पोलीस पथक तयार करून संतोषवाडी येथील शेतात धाड टाकली. तुर व कपाशीमध्ये गांजाची लागवड केलेली आढळून आले. लागवड करणारे आरोपी आनंदा गोवर्धन जाधव व उल्हास रतन जाधव रा. संतोषवाडी हे घटनास्थळावर मिळाल्यानंतर त्यांना पोलिसांनी अटक केली. यामध्ये उल्हास रतन जाधव यांच्या शेतातील १५० गांजाची झाडे किंमत आठ लाख चाळीस हजार रुपये तर आनंदाराव गोवर्धन जाधव यांच्या



शेतामध्ये १२७ गांजाची झाडे किंमत सात लाख अंशी हजार असा एकूण सोळा लाख वीस हजाराचा माल जप्त केला. पोलीस उपनिरीक्षक कपिल मस्के यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद करून दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे . सदर कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनात ठाणेदार प्रताप दत्तात्रय भोस , नायब तहसीलदार वैभव विठ्ठल पवार पोलीस उपनिरीक्षक कपिल मस्के जमादार गजानन खरात रवी गीते मोहन चाटे विद्या राठोड शिपाई सतीश चव्हाण दत्ता कुसराम निलेश भालेराव मोहसीन पठाण तसेच पोलीस स्टेशन महागाव चे पोहवा मुन्ना आडे मोजमाप अधिकारी शंकर हरणे व उमरखेड येथील आरसीपी पथक यांनी पार पाडली पुढील तपास ठाणेदार प्रताप घोष करीत आहे.

## नुकसानग्रस्त शेतीमालाचे पंचनामे करून भरपाई द्या : गांगुर्डे



आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** परतीच्या पावसाने नासिक जिल्ह्यासह निफाड तालुक्यातील कोटमगाव सह परिसरातील वनसगाव, खडक माळेगाव, शिवडी, सोनेवाडी, खानगाव, थेटाळे, विठ्ठलवाडी, टाकळी विंचूर आदी गावात व परिसरात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी निसर्गाच्या अवकृपेने शेती पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असून तालुक्यातील शेतकरी चिंताग्रस्त झाला असून नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन सरसकट पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी,अशी मागणी कोटमगाव विकास संस्थेचे माजी चेअरमन तथा विद्यमान संचालक भाऊसाहेब देवराम गांगुर्डे यांनी शासनाकडे केली आहे.

तालुक्यातील शेतकरी नवनवीन प्रयोग करून व अफाट भांडवलाचा उपयोग करून शेती फुलविण्याचा आटोकाट प्रयत्न करत असतो.शेती फुलविण्यासाठी सहकारी सोसायटी, बँक, पतसंस्था, उसनवारी, सावकारी कर्ज कशावर फेडायचे असा यक्ष प्रश्न तालुक्यातील प्रत्येक शेतकऱ्याला पडला आहे.मागील आठवड्यात तालुक्यात कमी अधिक प्रमाणात भाग बदलत पाऊस पडत असतांनाच अचानकच तालुक्यातील बहुतांश भागात जोरदार पर्जन्यवृष्टी झाल्यामुळे उभ्या तसेच काढून जमा करून ठेवलेल्या सोयाबीन चे व कांदा उळे, टोमॅटो,मका व भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे .अवाढव्य खर्च करून मेहनतीने आणलेले पिकांचे नुकसान झाल्यामुळे व हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्यामुळे शेतकरी बांधव चिंताग्रस्त बनला आहे. निफाड तालुक्यातील कोटमगावसह वनसगाव, सारोळे खुर्द, खडक माळेगाव टाकळी विंचूर, मरळगोई, सोनेवाडी, नैताळे आदी परिसरात गेल्या एक महिन्यापासून वादळी वारा व अवकाळी पावसाने मका, सोयाबीन, कांद्याची रोपे, टोमॅटो व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून या पिकांचे सरसकट पंचनामे करण्यात यावे तसेच कृषी विभाग व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना सरसकट पंचनामे करण्याच्या सूचना देऊन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून द्यावी. अशी मागणी वंजारी महासंघाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष बाबुराव पाटील सानप (सोनेवाडी), अखिल भारतीय वारकरी मंडळाचे जिल्हा गोपालन समिती अध्यक्ष नवनाथ माऊली बोरगुडे (नैताळे), संदीप पवार (टाकळी विंचूर), शिवसेना तालुका उपप्रमुख विकास रायते (खडक माळेगाव),रासाका बचाव कृती समिती सदस्य अनिल शिंदे (थेटाळे), गणेश जगताप (मरळगोई),शरद भाऊसाहेब शिंदे, रामेश्वर काका शिंदे, संकेत गणपत शिंदे, अरुण कापडी (वनसगाव), सोपान काका भोसले (सारोळे खुर्द) आदींनी केली आहे.



# निवडणुका हरले म्हणून ‘कम्युनिस्ट’ विचारधारा संपली असे होत नाही

## माधव भंडारी : ‘डाव्यांचा खरा चेहरा’ पुस्तकाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** कम्युनिस्ट केवळ राजकीय निवडणुका हरले म्हणून विषय संपला, कम्युनिस्ट विचारधारा संपली असे होत नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि डाव्यांचा प्रवास समांतर आहे. तरी परंतु, विविध संघर्षमय कृतींच्या माध्यमातून लोकशाहीत यश प्राप्त करणे हाच डाव्यांचा उद्देश आहे असे प्रतिपादन भाजपचे जेष्ठ नेते माधव भंडारी यांनी केले. ते अंबाजोगाई येथील खोलेश्वर महाविद्यालयात रविवार, दिनांक 16 ऑक्टोबर रोजी आयोजित डाव्यांचा खरा चेहरा या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात बोलत होते. साहित्य निर्मितीतून राष्ट्रभक्तीचा संचार मनावर व्हावा, राष्ट्रीय विचारांची घुसळण होऊन साहित्य रसिकांचे प्रबोधन व्हावे या हेतूने साहित्य प्रेमी वाचकांसाठी लेखक माधव भंडारी (मुंबई) लिखित “डाव्यांचा खरा चेहरा” या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या खोलेश्वर महाविद्यालयात स्व.गोपीनाथराव मुंडे सभागृहात रविवार, दिनांक 16 ऑक्टोबर 2022 रोजी करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा हे होते. यावेळेस टी.बी.गिरवलकर अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.आय. खडकभावी यांच्या हस्ते “डाव्यांचा खरा चेहरा” या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. प्रवीण सरदेशमुख, प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे तसेच डॉ.निशिकांत पाचेगावकर या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते भारत माता व सरस्वती देवी यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी बोलताना भाजपचे जेष्ठ नेते व पुस्तकाचे लेखक माधव भंडारी म्हणाले की, केरळ, त्रिपुरा आणि पश्चिम बंगाल या राज्यात कम्युनिस्टांची



दीर्घकाळ सत्ता होती, कम्युनिस्ट केवळ निवडणुका हरले म्हणून विषय संपला, विचारधारा संपली असे होत नाही. कारण, हार जीत ही निवडणुकी पुरतीच असते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा व डाव्यांचा प्रवास समांतर आहे. 1925 सालच्या कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत त्यांनी जो संघर्ष केला, ते आपण विसरता कामा नये, कम्युनिस्टांकडून सोशल मिडीयाचा वापर, भारताची स्वातंत्र्य चळवळ, फाळणी वेळीची भूमिका, पंडित जवाहरलाल नेहरू यांनी महात्मा गांधी यांना लिहिलेल्या पत्राचा संदर्भ यावेळेस भंडारी यांनी दिला, 1947 साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर “ यह आझादी झुठी है । “ असे कम्युनिस्ट म्हणाले होते. कम्युनिस्ट आणि निजाम, 1962 मध्ये चीनने भारतावर केलेल्या आक्रमणा वेळीची कम्युनिस्टांची भूमिका, 1925 पासून ते 2022 पर्यंत त्यांच्या वागणुकीत व भूमिकेत कोणताही बदल झालेला नाही. “डाव्यांचा खरा चेहरा” हे पुस्तक पुराव्यांसह लिहिलेले आहे असे नमूद करून कम्युनिस्टांचा हाच चेहरा आहे. प्रास्ताविक करताना प्रविण सरदेशमुख यांनी मागील चार वर्षांपासून साहित्य क्षेत्रामध्ये मराठी साहित्यातून राष्ट्रभक्ती निर्माण व्हावी या हेतूने मराठवाडा साहित्य मंच कार्यरत आहे असे सांगितले. या प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी यांनी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना, कम्युनिस्टांची शिक्षण विषयक भूमिका, त्यांची सत्ता असलेल्या राज्यांमध्ये शिक्षणाची सद्यस्थिती, भारतीय संस्कृती, नवीन शैक्षणिक धोरणावर देखिल त्यांनी भाष्य केले. अध्यक्षीय समारोप करताना ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा यांनी गोरगरीब, गरजू मुलांच्या शिक्षणासाठी सातत्यपूर्ण धडपड करणारे खडकभावी यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले आहे हे स्वागतार्ह असून, भंडारी यांनी स्वानुभवातून या पुस्तकाचे लेखन केले, समाजात संवाद झाला पाहिजे, वैचारिक मंथन केले पाहिजे, भारतीय स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतरही ‘नक्षलवाद’ अस्तित्वात आहे यावर चिंतन होणे गरजेचे आहे, समाजात नेमके काय चालले आहे याचा विचार या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याच्या माध्यमातून मिळाला, असे मुंदडा यांनी सांगितले. सूत्रसंचालन राजेंद्र शेप यांनी केले, तर आभार डॉ.निशिकांत पाचेगावकर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी रा.गो.धाट, प्रा.डॉ. शरदराव हेबाळकर, विजयराव वालवडकर,अप्पाराव यादव,डॉ.गोपाळ चौसाळकर, नारायण केंद्रे, आबा नरवडे, अविनाशराव तळणीकर, रामभाऊ कुलकर्णी, अच्युतराव गंगणे आदी मान्यवरांसह साहित्य प्रेमी नागरिकांची या पुस्तक प्रकाशन सोहळ्यासाठी उपस्थिती होती.



# टिटवी येथे महर्षी वाल्मिकी ऋषी जयंती मोठ्या उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील टिटवी येथे महर्षी वाल्मिकी ऋषी जयंती मोठ्या थाटामाटात साजरी करण्यात आली. टिटवी येथे महर्षी वाल्मिकी ऋषी जयंती निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेचे पूजन पोलीस पाटील मधुकर गौलखेडे, सरपंच भागवत जाधव यांनी केले तसेच उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन केले. तसेच गावात मिरवणुकीला सुरुवात झाली. चौका चौकात महिलांनी रांगोळ्या काढून चौक सुसोभित केले होते. ढोलताशांच्या गजराज टिटवी गाव दुमदुमून गेले होते. महर्षीं वाल्मिकी ऋषी यांच्या दर्शनासाठी महिलांनी एकच गर्दी केली होती. यावेळी गावातील माजी सरपंच ताराचंद राठोड, प्रमोद पाटील, उपसरपंच लव राठोड, विनोद जाधव, संदीप जाधव,पो.पा.ज्ञानेश्वर राठोड, दांडगे, जाधव, गौलखेडे, कांडेलकर उपस्थित होते. महर्षीं वाल्मिकी ऋषीच्या मिरवणूकीत कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये याकरिता सपोनि देवीदास वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली बिटजमादार मिरखाँ तडवी, पो.काँ.शिवदास गोपाळ यांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता अशी माहिती सरपंच भागवत जाधव यांनी बोलताना सांगितले.



# सोयगाव तालुक्यात रब्बी हंगामाच्या पेरणीसाठी बियाणे उपलब्ध

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील विविध गावातील शेतकरी यांचे मार्फत रब्बी हंगामास सुरुवात झाल्याने ज्वारी ,मका ,हरभरा इत्यादी पिकांची लागवड सुरु झाल्याने तालुका कृषी अधिकारी कार्यालय सोयगाव यांचेमार्फत कृषी सेवा केंद्र सोयगाव येथे उपलब्ध असलेले प्रमाणित बियाणे उचल करण्यास सुरुवात झाली आहे. आज दिनांक १७ ऑक्टोंबर अखेर हरभरा या पिकाचे २८ क्विंटल प्रमाणित बियाणे उचल झाले असून तालुक्यातील इच्छुक शेतकरी यांनी देखील या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन तालुका कृषी अधिकारी सोयगाव एस.जी. वाघ यांनी केले आहे . सदरील बियाणे घेण्यासाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालय यांचे मार्फत परवाना घेणे बंधनकारक असून लाभार्थी शेतकऱ्याच्या नावावर जमीन असणे आवश्यक आहे .तालुक्यात कृषी सेवा केंद्र सोयगाव येथे हरभरा या पिकाचे बियाणे उपलब्ध असून प्रती पिशवी (३० किलो )अनुदान वगळता १३५० रुपये किंमत आहे .ती रक्कम शेतकऱ्यांनी त्वरित भरून या संधीचा लाभ घ्यावा अशे आवाहन कृषी पर्यवेक्षक हेमंत देशमुख यांनी केले आहे.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीसाठी प्रयत्नशील : माजी मंत्री लोणीकर

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** मागील अनेक दिवसांपासून जालना व परभणी जिल्ह्यासह संपूर्ण



मराठवाड्यात प्रचंड पाऊस सुरू असून परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांच्या अतोनात नुकसान झाले आहे. परतीच्या पावसामुळे हाता तोंडाशी आलेला शेतकऱ्यांचा घास निसर्गाने हिरावून घेतला असून शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत मिळावी यासाठी आपण केंद्र व राज्य सरकारकडे प्रयत्नशील आहोत, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरच मदत मिळेल अशी, अपेक्षा माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात व्यक्त केली. केंद्र व राज्य सरकारच्या नियमाप्रमाणे ६५ मिली पेक्षा अधिक पाऊस झाला असेल तर संबंधित शेतकऱ्यांना मदत मिळणे क्रमप्राप्त ठरते त्यानुसार जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, बीड, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर या सर्व जिल्ह्यांमध्ये परतीच्या पावसामुळे बहुतांश ठिकाणी ६५ मिली पेक्षा अधिक पाऊस झाल्यामुळे नुकसान झाले आहे या भागात अतिवृष्टी नसली तरी देखील सततच्या पावसामुळे हे नुकसान झाले आहे. प्रत्यक्ष सरकार मध्ये असताना ०१ लाख रुपये, ५० हजार रुपये, २५ हजार अशा केवळ घोषणाबाजी करणाऱ्या काँग्रेस नेत्यांनी अगोदर आपण सत्तेत असताना कोणत्या आश्वासनांची पूर्तता केली ते तपासून पहावे व नंतर शेतकऱ्यांचा प्रश्न हाती घ्यावा असेही लोणीकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात काँग्रेसला सुनावले. शिंदे-फडणवीस हे सरकार शेतकऱ्यांचे सरकार असून शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणार असून जालना, परभणीसह मराठवाड्यातील ज्या ज्या जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे त्या त्या शेतकऱ्यांना मदत करणार असल्याचे लोणीकर यांनी सांगितले.

# ६२ जणांचे प्राण वाचवण्यात यश

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मध्य रेल्वे सुरक्षा दलाच्या जवानांनी गेल्या नऊ महिन्यात जीव धोक्यात घालून ६२ प्रवाशांचे प्राण वाचविले आहेत. मिशन जीवन रक्षक” चा एक भाग म्हणून मध्य रेल्वेच्या सुरक्षा दलातील जवानांनी जानेवारी ते सप्टेंबर २०२२ पर्यंत मध्य रेल्वे मार्गावर आतापर्यंत ६२ नागरिकांचे प्राण वाचवले आहेत. नागपूर विभागात १४ , पुणे विभागात १२, भुसावळ विभागात आठ आणि सोलापूर विभागात चार घटनांची नोंद झाली आहे. रेल्वे सुरक्षा दलाच्या या जवानांना प्रवासी आणि रेल्वे मालमत्तेवरील गुन्हे, हिंसाचार, रेल्वे गाड्यांच्या वाहतुकीत अडथळा, हरवलेल्या मुलांची सुटका आणि रेल्वे तसेच अंमली पदार्थ जप्त करणे, प्रवाशांचे सामान परत मिळवून देणे इत्यादी विविध प्रश्न सोडवावे लागतात.

# भारतरत्न डॉ. कलाम म्हणजे स्फूर्तीस्थान : शंकर भामेरे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** जामनेर तालुक्यातील पहूर येथे दि. १५/२०/२२ रोजी भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम हे विद्यार्थ्यांचे स्फूर्तीस्थान असल्याचे प्रतिपादन समता शिक्षक परिषदेचे जिल्हा सचिव शंकर भामेरे यांनी केले. महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयात आयोजित वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. प्रारंभी मुख्याध्यापिका व्ही. व्ही. घोंगडे यांच्या हस्ते डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी बोलताना भामेरे यांनी डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या विद्यार्थी



दशेतील प्रेरणादायी प्रसंग सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दररोज किमान एक पान विद्यार्थ्यांनी वाचले पाहिजे, असेही त्यांनी आवाहन केले. यावेळी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पास्टर रेव्ह. गायकवाड यांनी घेतली बिशपपदाची दीक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** इम्मानुएल चर्च मिनीस्ट्रीज औरंगाबादचे पास्टर रेव्ह. रमेश बी. गायकवाड यांनी शुक्रवार दि.14 /10/022 रोजी इ.आय.एफ.सी.(इपिस्कोपल इंडिपेंन्डेट फेलोशिप चर्च डायसेस, नवी दिल्ली.) यांच्यावतीने एका शानदार सोहळ्यात बहूमानाची बिशप पदाची दिक्षा देण्यात आली. मौलाना आझाद रिसर्च सेंटर, टि.व्ही.सेंटर औरंगाबाद येथे रेव्ह. आर. बी. गायकवाड यांचा मोठ्या दिमाखात पार पडलेल्या बिशप दीक्षा विधी सोहळास महाराष्ट्रातून व बाहेरील राज्यातून महान देवाचे सेवक, राइट. रेव्ह. बिशप. डॉ. मुरगेसन जेकब (चेन्नई), राइट. रेव्ह. बिशप. डॉ.टि. एम.ओंकार (फाऊंडर चेअरमन गुजरात, ई.आय.सी.एफ डायसेस, नवी दिल्ली) राइट. रेव्ह. बिशप. डॉ. फिलीप जॉर्ज (मॉडरेटर बिशप गुजरात), राइट. रेव्ह. बिशप. डॉ.रजवाडी संदिपभाई (गुजरात) राइट. रेव्ह. बिशप. डॉ.श्याम सुंदर (तेलंगणा डायसेस) राइट. रेव्ह. बिशप. डॉ. रुस्तम नवल्या गावीत (गुजरात), राइट. रेव्ह. बिशप. डॉ.अमरसिंग (जनरल सेक्रेटरी इआयफसी), राइट. रेव्ह. बिशप.डॉ.सॅम्युवेल साकरपेकर (पुणे), राइट. रेव्ह. बिशप. डॉ. सुरेश सावंत (औरंगाबाद, महाराष्ट्र), राइट. रेव्ह. मोजस राज (अंद्र प्रदेश), रेव्ह. अमोल आर. गायकवाड (औरंगाबाद), यांच्या उपस्थितीत पवित्र विधी संपन्न झाला.

